
म. ग्रं. सं.

विषय

संग्रहालय क्रमांक

लेखक

पुस्तकाचें नांव



[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

ना.

# अरण्यरोदन

लेखक

रावजी हरि आठवले

सन १८८९

मराठी ग्रंथ संग्रहालय
नं० १७०
ठाणे सन १८९८

# अरण्यरोदन

## नाटक

ग्रं. नं. ...
ता. १५-१०-२८
अ. पो.

सूत्रधार—

पद

(जय श्रीरमणा भवभयहरणा, या चालीवर)

आदिपुरुष जगदेक प्रभू तो, अवम करो हें मागतसें।
ज्याच्या सत्तें हरिहर विधि सुर, स्थिरचर सर्वही वागतसे ॥ १ ॥
सगुणरूपें सगुणजगाला, सगुणभक्तिनें पावतसे ॥
परि निर्गुण निर्विकार आहे, ऐसें श्रुति प्रतिपादितसे ॥ २ ॥
मंगलदायक विघ्नविनाशक, तारक भावें या तोचि असे ॥
निश्चय जाणुनि तयासि भावें, निशिदिनीं हरिसुत वंदितसे ॥ ३

पद

( अष्टमूर्ति परमेश सदाशिव, या चालीवर )

शिवनंदन गणराज विनायक सदा शिव देवो ॥
ज्याच्या स्मरणें भवभय निरसे, तो तुह्मा पावो
॥ ध्रु० ॥
रिद्धि सिद्धि पावती जयाच्या कृपालेशमात्रें ॥
सर्वही दुरितें पळति जयाच्या सकृन्नाममंत्रें ॥
इष्ट मनोगत फळती जयाच्या विमल भक्तितंत्रें ॥
ऐसा तो प्रभु इहपर निशिदिनीं तुह्मा सुख
देवो ॥ शिव ० ॥ १ ॥

( मंगलाचरण झाल्यावर पुढें येऊन )

अशा तऱ्हेची ईश्वराची अगाध शक्ति मनुष्यास माहित असतां ही कित्येक राजकार्य धुरंधर पुरुष अधिकार मदानें अंध होऊन सज्जनांस विनाकारण पीडा देतात ही किती दुःखाची गोष्ट आहे!! प्रजेचें पुत्रवत पालन करणें हा मुख्य राजधर्म होय. असें असून राजाच जर अनीतिमार्गास प्रवर्तून प्रजेला पीडा देऊं लागला तर मग त्या बिचाऱ्या हतभागी प्रजेची किती बरें दुर्दशा होते.

साकी

राजा पीडी जरी प्रजेला माता वधि बाळाला ॥
स्वस्थ असावें दुर्दैवाचा समजुनि मनिं हा घाला ॥
उपाय अन्य नसे, विधिरेषा बलवान असे ॥

विदूषक— हं! हं!! हं!!! मित्रा, उदासीन होऊं नको. अरे, प्रत्येक अपायावर उपाय असतोच. मनुष्यानें प्रयत्न करावा, फलदाता ईश्वर आहे.

( साकी )

कां होसी तूं उदास मित्रा यत्नसाध्य जर आहे ॥
वस्तुमात्र ती, आणुनि चित्तीं उद्यमरत तूं राहे ॥
चिंता कां करिसी, यत्नें सिद्धकार्य होसी ॥

सूत्रधार— (आपल्याशीं) काय, माझा मित्र विदूषक!! मी सांप्रत आरंभिलेल्या कामास ज्याचें अनुमोदन घेणें अवश्य आहे, तो सुदैवानें या ठिकाणीं आला, फार चांगली गोष्ट झाली. ( विदूषकाकडे पाहून ) विदूषका, तुझ्या येण्यानें आतां मी निश्चिंत झालों.

विदूषक— कसें काय? कोणत्या गोष्टीची तुला चिंता होती ती प्रथम सांग मला, ह्मणजे माझ्या

मदतीनें तूं त्या चिंतेपासून मुक्त होशील किंवा नाहीं याचें मला तरी गणीत करतां येईल. नाहीं तर तुझी आपली एखाद्या माणसाला चण्याच्या झाडावर चढवण्याची ही नेहमीचीच रीत आहे. तुझ्या चिंतचें कारण काय आहे ते लवकर कळूं दे.

सूत्रधार—अरे इतकी घाई कसली?

विदूषक—तें कांहीं बाबा विचारूं नकोस. लोकांचा आपल्याला कांहीं उपद्रव होऊं नये ह्मणून हल्लीं आह्मी जंगलांत वास्तव्य केलेलें तुला ठाऊक आहेच.

सूत्रधार—बरें मग?

विदूषक—अरे मग काय विचारतोस, अलीकडे तें जंगल आह्माला नकोसें झालें आहे. आजपर्यंत आह्मी आपल्याला जंगलचे राजे ह्मणवीत होतों, पण अलीकडे सरकारची नजर जंगलावर अशी ह्मणतां खिळून गली आहे, किं झाडाच्या वाळलेल्या पाना पासून तों जमीनींत गेलेल्या मुळा पर्यंत सर्व झाडावर सत्ता त्यांची, जंगलांतली जमीन त्यांची, जंगली गवत त्यांचें, सारांश तुला थोड

क्यांत सांगतों झाडून सर्व जंगल केवळ राज्यक र्त्यांचेंच झालें आहे. आमच्या सारखीं जंगली माणसें वगळून हो. नाहीं तर आह्माला ही राख लेल्या जंगलांतलीं चालतीं बोलतीं झाडें समजाल. मित्रा, या जंगलावर सर्व लोकांचा चरितार्थ अव लंबून आहे. पण अलीकडे जी स्थिति झाली आहे ती सांगतां सोय नाहीं. तिचे थाडेसें करूं का वर्णन तुझ्याजवळ?

सूत्रधार—सांग सांग मित्रा, तूं जंगलचा राहणारा आहेस या मुळें तुझ्याकडून कांहीं तरी अनुभवि क गोष्टी कळतील.

विदू०—एकतर. जंगलरक्षणाची कशी मजा झा ली आहे ती.—

कटाव

पहा कैसी आहे मजा ही या जंगलरक्षणाची ॥ध्रु०
जंगली कायदा निर्माण झाला, हापीसरांच्या हातीं पडला, फार्समध्यें तो येऊं लागला, शेतक ऱ्यांना फारच नडला, मग ता जंगले राखुं लाग ला, सेटलमेंट हापीसराच्या अधिकाराला जोर ये ऊनी, अर्थाचा तो अनर्थ होऊनी, कागदी पुरावा

गेला उडुनी, वहिवाटीला कुलुप लागलें, हक्कांचें वाटोळें झालें, तब्बेतीचें मान वाढलें, जिकडे तिकडे जंगलें जंगलें, पसरुनि सगळें रान वाढलें, परी कोणातें शिवूं न देती, गुराढोरांतें हांकुनि लाविती, टाहाळ राबाची मनाई करिती, घरें झोंपडीं मोडुनि जाती, वाऱ्यावांचुनि ढोरें मरती, कांटी वांचुनि सर्वहि बागा नग्नच दिसती, चारिबाजुनी रयत नाडली, त्यांचा कोणीच असे न वाली, करणी ही दुर्दैवाची॥ पहा कैसी आहे ० ॥ १ ॥

गरीब दुबळे अरण्यवासी, तसेच तापसी, करिति सदां जे कृषिकर्मासीं, बाळगिती जे गाई म्हैसी, ऐसे गवळी, तसेच माळी, साळी गोंधळी, संपूर्णाहि ती विप्रावळी, प्रत्यक्षाप्रत्यक्षतेनें, राखुनि रानें, फलमूलादिक बहु सन्मानें, खाऊनी ठेऊनी संग्राहिं विकुनी, उदरपोषणा, वस्त्र ढुंगणा, मिळवायातें, यत्नकरिती बहु,रीत अशी ही सर्वत्रांची ॥ पहा कैसी आहे मजाही० ॥ २ ॥

ऐशी ही रित चालत आली, माजी राज्या पासुनि वहिली, होती जेव्हां सत्ता पहिली, आंग्ल

भौम राजाचि—राहिली तशीच, परि सार्वभौम अंमलीं, जंगलें राखिलीं, ऐशी सक्त दंवडी पिटली, गरिब रयत ही फार नाडली, तोहुं न देती लकडी सोटा, वांसा मोठा, गवत टहाळ, नांगराचे फाळ, होती दुर्मिळ, शेती सर्व ही करिती हळ हळ, कोणि न त्यांची करिती कळ कळ, वेळ अशी ही संकटाची ॥ पहा कैसी आहे० ॥ ३ ॥

जंगल रिझर्व होतां ॥
होती हलवाह नित्य कष्टी तें ॥
किति वर्णावें, विजनीं ॥
अंध रडे हारवोनि यष्टीतें ॥ १ ॥
हा अक्टा हा रूळा ॥
हा हुकुमा काय मांडिला निकर ॥
जंग्लाचा बा तुझी ॥
झाला बहुतांशीं काय हानिकर ॥ २ ॥
धंदे सर्व बुडाले ॥
हा अक्टा पुरविलीस कां पाठ ॥
नसको सोसाया हें ॥
फारेष्टरशीं नको नको गांठ ॥ ३ ॥

असो ही सर्व कर्मकटकट तुझ्या जवळ सांग

ण्याचें कारण इतकेंच, आज स्वयंपाक करायला घरांत लांकडें नाहींत ह्मणून बायकोनें आह्मांला मोळी आणण्याकरितां पाठवलें आहे, तो येतां येतां ही मंडळी जमली ह्मणून काय मजा आहे ती पहाण्याकरितां येथें आलों, इतक्यांत तुमची ही गांठ पडली. तुह्मीही आमच्या सारखेच चिंतातुर दिसतां; इतकेंच नव्हे, पण मगाशी तुह्मी-प्रजा पीडी जरि राजाला ॥ बाळ वधि मातेला! असें कायसेसें ह्मटलेंत.—

सूत्रधार— हं! हं!! असें भलतेंच बोलूं नको. राजभक्त प्रजा आपल्या राजाला कधीं ही पीडा देत नाहीं.

विदूषक—तर मग काय ह्मणता, राजा प्रजेला पीडा देतो होय?

सूत्रधार—दुर्दैवानें असें ह्मणण्याचा प्रसंग आला आहे खरा बुवा जंगलच्या संबंधानें हल्लीं लोकांना अधिकाऱ्यांकडून किती पीडा होत आहे तें तुला स्वानुभवावरून माहीत आहेच. हे सर्व सभाजनही या अपूर्व पीडेचें निवारण करण्याविषयीं कांहीं योग्य उपाय योजावा ह्मणून एकत्र झाले

आहेत. मित्रा हीं अरण्यें आणि हे गगनचुंबित वृक्ष परमेश्वरानें केवळ मनुष्यांच्या सुखार्थ उत्पन्न केले असून त्याचा उपभोग घेण्यास सांप्रत प्रतिबंध होत आहे. मित्रा ही आरण्यशोभा पाहिलीसना!

कटाव

साग शिसवा आंबेराई, फणस बकुल तो अशोक पाहीं, खैर लिंब आणि बाभुळ तीही, हरडा बेहळा आणि शिकेकाई, लतावृक्ष ज्यां परिमित नाहीं, ऐसे प्रभुने वनीं निर्मिलें, परोपकारा उभे ठाकले, नित्यसुकृतिनें पुण्य सांठलें, ह्मणुनि वाटतें गगन भेदुनी, स्वर्गारोहणी, तयार झाले, असती मागें त्यांचे चेले, तेहि त्यांस वाटे अनुसरले, जेवि तपस्वी, तेवि मनस्वी, असुनि सर्वदा तुष्टच असती, शत्रु मित्र हा भेद नेणती, परकार्या बा देह खर्चिती, मनुजसुखासाठीं वाटेही सर्व तयारी देवाजीची ॥ पहा कैसी आहे मजा ही, या जंगलरक्षणाची ॥

या ईश्वरनिर्मित लाभास मुकल्यामुळें हे पहा सर्व लोक कसे दीन होऊन . राज्याधिकाऱ्यां जवळ आपली दाद लागावी ह्मणून रानावनांत हिंडत आहेत!!

विदूषक—बरें मग, तुह्मी आतां इथे ही रंगभूमी तयार करून काय करणार?

सूत्रधार—विदूषका, जंगलाचे बाबतींत सरकारा पासून रयतेस जी अनेक प्रकारची पीडा होते त्याचें ज्यांत यथार्थ वर्णन केलें आहे, असें अरण्यरोदन नांवाचें नाटक कोणा एका कवीनें रचलें आहे, तें नाटक या रंगभूमिवर अभिनीत करण्याविषयीं सभाजनांची आज्ञा झाल्यावरून पात्रयोजना वगैरे कशी करावी या विचारांत मी होतों. इतक्यांत तुझी भेट झाली. तर आतां हा प्रयोग पुरा करून नंतर आपल्या इच्छित कार्याला गमन कर.

( पडद्यांत )

( ये गांवका पटेल कौन है, कौन है पटेल. हरामखोर, मालुम नहि सुवरकूं साबकी सवारी आने की? पटेल, पटेल. )

सूत्रधार—विदूषका, आज जंगलच्या अधिकाऱ्यांची स्वारी या ठिकाणीं येणार आहे. ही पहा शिपाई लोकांची आरडा ओरड सुरू झाली. यावरून साहेबाची स्वारी नजीक आली असें वाटतें.

ग्रंथ संग्रहालय

तर चल आपण येथून दुसरेकडे जाऊं.

( असें म्हणून दोघेही जातात. )

( ही प्रस्तावना झाली. )

---

( एक शिपाई धांदलीनें येतो )

शिपाई— किदरगया पटेल क्या सुवर है, ( पडघाकड पाहून ) कौन है, जाव पटेलकूं बुलाव. ( पाटील येतो )

पाटील—रामराम, शिपाइ बुवा. सुवारी तर लई लवकर आली.

शिपाई—क्या तुमारी सुस्ती है. तुमकूं मालूम नहीं साबकी सवारी आनेकी?

पाटील—जी व्हय, मालूम हाये म्हंजे. ये आपलें—काय तिच्या भना—नावबी यंत न्हाई बगा. ये आपल अशिटण कालेटर न्हवका?

शिपाई—क्या तुम गद्धा है. सूअर, नामभी नहीं बराबर बोल सकता. ये अश्टिन कलेटर नहिं है, ये तो जंगलका बडा साब है.

पाटील—ह्यो सुवारी येनेची आपलेला खबरबी न्हाई बगा.

शिपाई —खबर नहीं, हरामखोर, तुमारी पटेल गिरी जपत होजायगी जब खबर पडेगी.

पाटेल—ह्यो बगा शिपाइ बुवा, इकती डुरका वनी दाबाया नग. तुमीबी सरकारी मनुक्श, आन आमीबी बापदादा पासन सरकारचीच चाकरी कर तूं या.

शिपाई—देखो, तुम ऐशी जादा बात करेगा तो हम एकदम बडे साबकूं रपोट करेगा.

पाटील—( रागानें ) मंज्ये, इकती गुरकाव नीं कशापाई. हिथ काय योक सायब यनार, तर त्येची तब्बेत संभाळावी. आमास्नाबी काइ बरदार हयेकि न्हई?

शिपाई—तुमारे घरकूं क्या करनेका हाय. साबकी मर्जी खप्पा होयगी मालुम नहीं. तुमारेसें अच्छा बंदोबस्त न रहेताहोय तो तुमारी पटेल गिरी जपुत हो जायगी.

पाटेल—हित कोन त्येकाच्या धूप घालतोया ह्या पाटीलकीस. आन त्या सायबाच्या तब्बेतीस बी कोन पुसतो या!!

शिपाई—अच्छा, चलो साबके तरफ.

पाटेल—कोन ग्येकाचा न्हाई झनतो. अपुन तर तयारच. कालेटर सायबास्नी बी मी धापाच येळा राजीनामा दिलाया. यो पाटीलकीबी नग, अनबगा शिपायबुवा ती खटरागबी नग. ( तलाठी येतो ) ह्यो बगा, बामन येतोया बामन. यो कुल करनी हाये. ह्येच्या संगें कराकी समदी मसलत.

शिपाई—क्यंव तलाठी, तुमकूं पटेलनें समजूत नाहिं दिया?

तलाठी—कसली समजूत बुवा.

शिपाई—तुमकूं मालूम नाहिं साबकी सवारी आने की?

तलाठी—कोण? जंगलचे साहेब किं नाहीं? ठाऊक आहेत आह्माला आज यायचे ते.

शिपाई—फेर, उधर तो तुमारी कुच तयारी बी नहिं दिखती.

तलाठी—तयारी कसली असायची. अर्जदार लोकांना हजर ठेवले आहेत. आलें दप्तरचे सर्व कागदपत्र हजर आहेत.

शिपाई—बस, होगया सब? साबके वास्ते कुच मुरगी, तरकारी, दूध, और हमारे वास्ते कुछ सीधा

सामुग्रीकी तयारी करनेकी मालूम नहिं तुमकूं? ये सब काम पटेलका और तुमारा है.

तलाठी—शिपाई बुवा, हें पहा, घुस्सा येऊं देऊं नका. आमचीं कामें काय आहेत हें आह्माला ठाऊक आहे. पदरचे पैसे खर्चून तुह्माला कोंबड्या, भाजी, आणि दूध पोंचवायला सरकार कांहीं आह्माला शेंपन्नास रुपये पगार नाहीं देत. मला दरमहा हदा रुपड्या मिळणार आणि या पाटलाला सारे वर्षाचे दोन रुपये मिळतात.

शिपाई—क्या बरसका दो रुप्या?

तलाठी—अहो दोन काय पण एक रुपया आणि आठ आणे देखील सालीना कित्येक पाटील लोकांना आहे. तेव्हां बिचाऱ्यांनीं पाट बांधून सरकारची ताबेदारी करावी तरी कशी? त्यांतून तुमच्याकडे आह्मी लोकांकडलें सामान घेऊन दिलें तर रुपयाचे आठ आणे हातांत आले तर नशिब, नाहीं पेक्षां सगळ्यालाच हरताळ लागतो. बरें, लोक कसे कायकेशरि आणि बेपर्वा झाले आहेत तें तुह्माला ठाऊक आहेच. आणि बिचारे लोक तरी काय करतात. त्यांच्यांत कुठे त्राण राहिलें

आहे. खुद सरकारनेंच त्यांना सर्व प्रकारें नाडले आहेत. हे पाहिलेतना या जंगलामध्यें हजारों लोक स्वत: अर्ज घेऊन सायबाकडे दाद मागण्या करितां आले आहेत.

शिपाई—अबी तुमारी ये सब बात रहेना देव. सामानका जलदी बंदोबस्त करो.

तलाठी—तें समजलों. पाटील, जा त्या आसला मारवाड्याचे दुकानावर, आणि त्याच्या दुकानांतून यांना दे काय सामान लागेल तें. पैसे ह्मणावें मी देईन मग काय होतील ते, जा. शिपाई बुवा या पाटला बराबर.

शिपाई—अच्छा, देखो कुलकरनी, तुमारा नामक या?

तलाठी—काय करायचें नांव? नाव आमचें पोटोपंत समजलेत.

शिपाई—( हासून ) तुमतो बहुत मस्करी करते हो अच्छा, पोटोपंत, ये पटेलकूं मुरगी और—

तलाठी—ती सर्व कांही व्यवस्था करील तो. जा तुह्मी.

( शिपाई व पाटील जातात )

पडद्यांत—पाटचेल, पाटचेल, पाटचेल को टयेंहाय, पाटयेल, शिपाय किदर गये· पाटयेल·

तलाठी—बहुधा ही बटलर साहेबांची स्वारी आलीशी वाटते. होय हे आलेच.

बटलर—( हातांत भाजीची बास्केट घेऊन विडी ओढीत येतो. ) पाटयेल, पाटयेल, पाटये ल किदरगये? ( कुळकरण्याकडे पाहून ) तुम कुलकरनी हसका शिपाय खैं ग्येलो, माका क्येगी सांग. माका भेटलोनी

तलाठी—तुमचे शिपाई बुवा पाटला बराबर आतांच गेले.

बटलर—कोटयें गेले ? माका खबरनी. मस्का खंय हाय, मुरगी खंय हाय, अंडीं खंय हाय, टिपनीचा वखत झालो. साब हातां येल हम क्या करेगा. पाटील किदर गया. सामान खंय हाय ( बुट आपटून ) भेतर हाम साबकूं बोलेगा. दयाम रास्कल, तुमकूं खबर नहि, तुमारे वास्ते हम साबकू बोलेगा.

तलाठी —हें पहा, बटलर साहेब

बटलर—बटलर साब बटलर साब क्या

करते. सामान किदर हाय? आबी साब रोटी मागेल.

तलाठी—पण येणार केव्हांसे साहेब?

बटलर—माका आथा विचारतस? पाटचेल कोटये हाय. तूं बामन हसका?

तलाठी—आहें खरा बुवा ब्राह्मण.

बटलर—अबी सामानका बंदोबस्त क्या है. साब टी तो आथा मागेल.

तलाठी—टी तें काय बाबा

बटलर—डच्याम. टी खबर नई तमकूं? उसमे दूध और शुगर डालके पिते नै, उस्कुं टी बोलते.

तलाठी—समजलों, चाहा तो ( पाटील येतो ) हें पहा पाटील बुवा, या बटलर सायबा बराबर जा. आणि यांना काय सामान सुमान पाहिजे असेल त्याची तरतुद लावा. मी जातो आतां तबूंत देवळामध्यें रुमाल ठेवले आहेत तेवढ घेऊन तंबूंत या बरें लवकर.

( सर्व जातात. )

# प्रवेश २ रा

## कचेरीची जागा

( कारकून वगैरे लिहित बसले आहेत—शिपाई आपले कामांत गुंतले आहेत—पहारेकरी पहारा करीत आहेत—अर्जदार तेवुऱ्या बाजुस बसले आहेत —दाहा वाजतात. )

शिरस्तेदार—विष्णुपंत, तुमचे कागद तयार जाले?

विष्णुपंत—तेवढा सोनतुकड्याचे कुळकरण्याला हुकुम द्याहायचा आहे तेवढा लिहिला ह्मणजे झालें.

शिरस्तेदार—कशाबद्दल बरें? हं! हं!!?समजलों. त्या इनामदाराला समजूत देण्याकरतांच किं नाई? खरोखर हा फार अन्याय आहे!! त्या इनामदाराचे जंगलावर वास्तविक आपला कांहीं सबंध नाहीं, पण सरकारानें ठराव केल्यावर आपलें काय चालतें? पण ते जंगल ह्मणजे शुद्ध सोन्याचा तुकडा आहे. तेवेंढका त्या इमानदाराचे हातांतून गेला

ह्मणजे त्याचें बहुतेक वैभव आटोपेल. बरें त्याहा, हुकूम तर तुह्मी ल्याहा. आज सकाळीं पुन्हा मला साहेबानें त्याबद्दल विचारलें, आतां सहीला तयार झाला पाहिजे. ( चिमणाजीपंतास ) बरें चिमणाजी पंत, मामलेदाराच्या मार्फत ते पाटलांना हुकूम पाठवायाचे ते तयार झालेका? ( चिमणाजीपंत कागदपत्र चाळतो ) काय शोधता काय! मी काय विचारलें समजलेत?

चिमणाजीपंत—समजलों. तो रपोटच सोधतों आहें.

शिरस्तेदार—कोणाचा रपोट?

चिमणाजीपंत—तो ह्याचा, आपल्या त्या पाटलाचा.

शिरस्तेदार—एकंदरींत हुषार खरे तुह्मी. तो रिपोर्ट नाहीं विचारीत तुह्माला. पाटलांना हुकूम पाठवायचे तयार करायला सांगितलें ना तुह्माला, गांवाशेजारच्या पडीत जमिनींत गुरें न चारण्याबद्दल.

चिमणाजीपंत— हां हो, सांगितलें होतें खरें, मी विसरलोंच. आतां लिहितों.

शिरस्तेदार—त्याहा त्याहा तर. विसरलों ह्मटलें ह्मणजे झालें. बोललें ह्मणजे तुह्माला राग मात्र येतो पण अशानें काम कसें होणार!

चिमणाजीपंत—नाहीं, लिहितोंच आतां. पण ते दोन तीन गांवचे लोक भेटले होते मला, त्यांचें असें ह्मणणें आहे कीं त्या जमिनींत गुरें चारण्या चा पूर्ववार आमचा हक्क आहे.

शिरस्तेदार—चिमणाजीपंत, तुह्मी तरी विल क्षण मनुष्य आहा बुवा. सरकारनें केलेला ठराव फिरवायचा का अधिकार आहे तुह्माला.

चिमणाजीपंत—तसें नव्हे. आपलें कानावर घालून ठेवावें ह्मटलें.

शिरस्तेदार— कुणाच्या! माझ्या का कानावर घालून ठेवलेंत. मी का कुणी गव्हर्नर का आहें!

चिमणाजी— नाहीं तसें नाहीं. पण लोकांना फारच आडचण होणार आहे त्यापासून, तेव्हां ह्मटलें त्याहायचेच हुकूम कि कसें काय?

शिरस्तेदार— तुह्माला आतांशें चिमणाजी पंत परोपकाराची विशेष आवड वाटते, तेव्हां ह्मटलें पेनशन घ्या ह्मणजे सार्वजनिक कामांत शि

[stamp]

रायला सांपडेल. पण तुह्माला लोभ कठे सुटतो. आं हें. बरें चला, तुह्माला सांगितलें तेवढें काम करा. हुकूम आतांचे आतां लिहून सहीला गेले पाहिजेत ( बारनिशी कारकुना कडे पाहून ) कां रामभाऊ कलेक्टर साहेबां कड तो जरुरीचीं दोन तीन प्रकर्णं जावयाचीं होतीं त्याची बारनिशी झालीका?

रामभाऊ—हे लखोटे अगदीं तयार करून ठेवले आहेत. आतांच्या टपालाला रवाना होतील.

शिरस्तेदार—आरे हो. कोण आहे शिपाय

शिपाई—जी, मी हाये तो दौलत्या.

शिरस्तेदार—अरे टपाल कुठे आहे आजचें? कोण गेला होता टपाल आणायाला?

शिपाई—त्या संभुजवळ हाये.

शिरस्तेदार—हाक मार त्या गाढवाला. टपाल आणलें तर इथे आणुन द्यायचें नाहीं समजत त्याला (संभु टपाल आणन देतो. शिरस्तदार थैलींतून लखोटे घेऊन वाचतो) फक्त सरकारी कामाचा, फक्त सरकारी कामाचा, फक्त महाराणीचे कामाचा, फक्त मलिका माहाजमाचे कामाचा, बरें हें इंग्रजी

लखोटे साहेबाचे खासगी आहेतसें वाटतें. संभू, जा हे लखोटे सायबाचे तंबूंत नेऊन दे. आणि साहेबांना यायला किती वेळ आहे पाहून ये. ( आणखी लखोटे वाचतो. ) मेहेरबान कनसरवेटर साहेब बहादूर, हा त्या पैकीं, हें कुणाचें पत्र—ति° राजमान्य राजश्री चिमणाजी माधवराव लुकतुके यांस—चिमणाजीपंत घ्या हें तुमचें पत्र. शिपाय हें पत्र दे चिमणाजीपंताना. ( बाकीचे लखोटे फाडून वांटून देतो. ) काय आहे चिमणाजीपंत पत्रांत?

चिमणाजीपंत—जंगलचा बंदोबस्त झाल्या मुळें सर्पणाची फारच माहागाई झाली आहे. साल मजकुरीं आपल्यास २० रुपयांचें तरी निदान सर्पण लागेल. लोक अर्ज वगैरे करण्याचे खटपटींत आहेत तेव्हां रानाची सुटका होईल किंवा कसें सुटका होण्याजोगी असल्यास सर्पणाची खरेदी करण्याचें तूर्त तकुब करूं. बाकी कांहीं घरगुती गोष्टी आहेत.

शिरस्तेदार—आणि आतां सांगितलीत येवढी मात्र सरकारी होती वाटतें. शिपाय किती वा

जले पहा बरें. ( अकरा वाजतात )

( कांहीं अर्जदार येतात )

एकजण—कां शिपाई बुवा. शिरस्तेदार साहेब आहेत का कचेरींत? अजून साहेब नाहीं ना आले. ( शिरस्तेदाराजवळ कित्येक मंडळी जातें व नमस्कार नमस्कार होऊन बसतात )

शिरस्तेदार —कां, आज येवढी सगळी मंडळी जमून निघाली कुणीकडे? हा सार्वजानिक संबंध दिसतो बहुतकरून.

अर्जदार—असें तर खरें. शुक्लकाष्ट लागलें आहे ना लोकांच्या मागें. आतां घरेंदारें सोडून जाण्याचा प्रसंग आहे. सरकारनें लोकांचें मिठागर बुडवलं. बरें, जमिनीमध्यें भात वगैर पिकण्याचें तर त्याला राबा करितां जंगलांतला टाहाळ बंद केला, दुसरें शेतकीच्या कामाला मुख्य साधन गुरें, त्यांची चरण्याची बंदी केली. मिळून शेतकीचे नांवानें इकडे ही अशी बोंब. बरें इतक्या अडचणींत कुठे मुठमर दाणे आले गरिबाच्या हातांत तर ते शिजवण्याला जंगलांतुन चार फांटीं आणायची देखिल पंचाईत. अहो, फार तर

काय, पण असा जंगलाचा बंदोबस्त कायम राह्यला तर गोर गरीबांचीं प्रेतें जाळण्याला लांकडें मिळणार नाहींत. परवां कुठल्याशा एका वर्तमानपत्रांत वाचलेंतना, किं प्रेतें समुद्रांत फेंकून देण्याबद्दल एका साहेबानें एका सभेंत बोलून दाखवलें, तशांतलाच प्रसंग येणार आहे.

शिरस्तेदार—तह्मीं ह्मणता तें सगळें खरें पण कायद्या पुढें कुणाचा इलाज चालणारें आहे?

अर्जदार—कायदा तर ह्याडच आहे. आणि तो होण्याचे पूर्वीच त्या पासून रयतेवर कोणतीं संकटें येतील हें आह्मीं अर्जद्वाराने सरकारला कळविलें होतें. पण त्याचा त्या वेळीं कांहीं उपयोग झाला नाहीं. आतां तर त्या कायद्या पासून कशा प्रकारचीं संकटें येऊन गुदरतात याचा आह्मास प्रत्यक्ष अनुभव आल्यामुळें असला हा कायदा अजीबाद रद्द करावा किंवा निदान त्यांतलीं कांहीं कलमें तरी अवश्य रद्द करावीं ह्मणून आंह्मीं हिंदुस्थान सरकाराकडे अर्ज पाठवणार आहोंत, पण तिकडून

निकाल होऊन येई पर्यंत इकडे आमचा निकाल होण्याची वेळ आली आहे त्याची कांहीं तरी तजवीज केली पाहिजे ना. हे पहा, तुह्माला सांगतों, कायदा किती जरी वाइट असला, तथापि तो अमलांत आणणारे अधिकारी जर विचारी आणि दयाभूत असले तर त्या पासून केवळ रयतेची नागवणूक होत नाहीं. पण मुळीं अधिकारी पिसे असून त्यांच्या हातांत जरका असला द्वाड कायदा पडला तरमग रयतेचे हाल कुत्रा देखील खायचा नाहीं. सध्यातर जंगलाचे कायद्याचा बहुधा असाच प्रकार झाला आहे. या कायद्यानें आमच्या खासगी वतन वाडच्यांत सुद्धां किहो हात घातला. आतां साहेब केव्हां येतील! इकडे येतील न?

शिरस्तेदार—पहावें आतां. शिपाई गेला आहे. आतां समजेल काय आहे तें.

अर्जदार—कशी काय पण साहेबांची तब्बेत आहे?

शिरस्तेदार—हुकूम दिलेले फिरवतीलसें वाटत नाहीं बुवा.

अर्जदार—बरें समजेल काय होईल तें.

( शिपाई साहेब येण्याची वर्दी देतो. कचेरीं तील कारकून वगैरे अदबीनें बसतात. अर्जदार बाहेर निघून जातात. बारा वाजतात )

साहेब—पटेवाला, पटवाला—सीपाय सी पाय—

शिपाई—( साब साब करीत पुढें जातो साहेब कचेरींत येतात. )

साहेब—सिपाय, टंबूमे जाव, और टेबलपर पेपरका बंडल है ये लेकर आव. ( शिपाई जातो. ) वेल शिरस्तेदार—

शिरस्तेदार—सर—(शिरस्तेदार धांवलीनें कागद सह्यां करतां घऊन जातो. )

साहेब—( सहीला ठेवलेले कागदाकडे पाहू न ) वेल व्हाट्स द्याट? क्या है?

शिरस्तेदार—लोकांनीं आपल्या खाजगी वा ड्यांतील झाडे तोडून तीं त्यांस गांवाचे हद्दी बाहेर न्यायचीं असतील तर त्या कामीं त्यांणीं फारेस्ट आफिसरचा दाखला घेतल्यावांचून नेऊं नये असें ठरविलेलें झालें आहे. परंतु या पासून लोकांस फारच अडचण पडते ह्मणून ते अर्ज

वगैरे करण्याचे तयारींत आहेत, या करितां सरकिलरा प्रमाणें अंमल चालवायचा किंवा नाहीं, अशा विषयीं रेंजरनें रपोट केला आहे, व त्यांचें असें ह्मणणे आहे कीं, या कामीं योग्य नजर ठेवण्या विषयीं तलाठी लोकांस हुकूम झाले पाहिजेत.

सायब.—यस आफ कोर्स. सरकिलरके माफक अंमल होना जरूर है. क्या लिखा हः लोक आरज करनार हैं, डचाम दाट आरज- वेल नौ, आय एम गोईंग टु राईट टु धी कलेक्टर.

शिरस्तेदार —सरकिलरा प्रमाणे अंमल झाला पाहिजे. या करितां तुह्मीं त्या कामीं स्वतां नजर ठेवावी. लोक दांडगाईनें किंवा छपावून लांकडें अगर सर्पण हद्दी बाहेर नेतील तर त्यांच्यावर कायदेशिर तजविज करावी. तलाटी लोकांस या कामीं नजर ठेवण्या विषयीं हुकूम पाठवावे ह्मणून मेहरबान कलेक्टर साहेब बहादूर यांज कडे लिहून गेलें आहे.

साहेब.— ( सही होते ) ये क्या है?

शिरस्तेदार— सोनतुकडचाचे इनामदाराला

हुकूम दिला आहे, त्यांत त्याच्या गावांत असले
ले जंगला वर त्याचा कोणत्याही प्रकारचा हक्क
नाहो ह्मणून सरकारचा ठराव झाल्या बद्दल लि
हिलें आहे:—

साहेब—ॲंड कापी ?

शिरस्तदार—यस युवर मोस्ट ओबिडिअंट.
सरकारच्या ठरावाची नक्कल त्या हुकमा सोबत जो
डली आहे. (सही होते) हें त्या यांचें बील आहे
अलिकडे स्टेशनरी सामान आणल्या बद्दल. जंग
लचे हद्दीवर मारण्या करितां तार खरेदी करून
आणली त्याच्या खर्चाचें हें बील आहे. रेंजर
लोकांनीं डायऱ्या पाठवण्याचे संबंधानें कशी व्यव
स्था ठेवावी त्याजबद्दल सरकिलर आहे हें. लोकां
नीं आपल्या खासगी वाड्यांतील तोडलेलीं झाडें
वगैरे परहद्दींत नेण्याबद्दल पासबुक पाहिजे ह्मणू
न हे अर्ज केले आहेत. त्यावर गार्डांना हुकुम
लिहिले आहेत तपास करण्याबद्दल. राखलेले
जंगलांतल्या मोळ्या व वडाचीं पानें नेल्याबद्दल
कांहीं लोकांवर गार्डानें फिर्यादी दिल्या होत्या,
परंतु त्याकामीं साक्षी पुरावा नाहीं ह्मणून माजि

स्टेटनें सर्व आरोपितांस सोडून दिलें, यामुळें जंग लच्या बंदोबस्ताच्या कामीं मोठी हरकत पडते असा गार्डाचा रिपोर्ट आहे.

साहेब—व्हाट इज इट? क्या लिखा है? (शिरस्तेदार "राखलेल्या जंगलांतल्या मोळ्या" ये थपासून पुन: सुनावणी करतो.) नानसन्स ड्याम दॅट माजिस्ट्रेट. वेल, गो आन्.

शिरस्तेदार—हा दुसरा रिपोर्ट रेंजरचा त्या प्रमाणेंच आहे. त्याचें असें ह्मणणें आहे कीं, दोन असामी कातकरी सरकारी राखलेले जंगलांतून वडाच्या पानाचे पुडे नेत असतां त्यांस पकडून माजिस्ट्रेटाकडे रवाना केले, त्याचप्रमाणें एका मनु ष्यास राखलेल्या जंगलांतील कुडयाच्या शेंगा ने तांना पकडून माजिस्ट्रेटकडे पाठवला. या संबंधा नें माजिस्ट्रेटानें असा ठराव केला आहे कीं "स दर तिनही आरोपींवर भरपूर पुरावा नसून शिवाय त्याणी जो माल चोरल्याबद्दल त्यांच्यावर फिर्याद करण्यांत आली आहे तो इतका थोडया किंमती चा आहे कीं, त्याविषयीं अगदीं साधारण गरी ब स्थितींतला मनुष्य सुद्धां आपलें नुकसान झा

लें असें मानणार नाहीं. तशांतून कातकारी यांस ते वड राखलेले जंगलांतले आहेत असें माहीत नसल्यामुळें व त्यांची नेहमीची वहिवाट आहे ह्मणून त्यांहीं थोडीं पानें तोडलीं. पण त्यापासून सरकारी जंगलाचें किंवा ज्या झाडांचीं पानें तोडलीं असें फिर्यादीचें ह्मणणें आहे त्या झाडाचेंही कांहीं नुकसान होण्याची भीती नाहीं. कुडच्याच्या शेंगा नेणारे अरोपीनें तर त्या केवळ औषधाकरितां तोडल्या असून त्याची किंमत फार तर तीन पै होईल. तेव्हां अशा अगदीं क्षुल्लक कृत्यास चोरीचें भयंकर स्वरूप देऊन जंगलचे अधिकारी जरी कडक रीतीची शिक्षा होण्याविषयीं यत्न करीत आहेत, तथापि न्याय दृष्टीनें तसें करणें रास्त नसल्यामुळें एकवेळ अरोपी यांस ताकीद देऊन आह्मी सोडून देतो" असें सांगून सदर अरोपींस दोषमुक्त केलें. तव्हां अशा रीतीनें काम चाललें असतां जंगलच्या अधिकाऱ्यांचा दाब न राहतां जंगलरक्षणाचे कामास हरकत होईल, हें खावंदांस जाहिर करीत आहें.

साहेब—वेल् शिरस्तेदार?

शिरस्तेदार—सर—

साहेब—द रेंजर सेज इज काइट राइट. रेंजर का रिपोर्ट बराबर हय. ये मॉजिस्ट्रेट आयसा काम करेगा तो जंगलका बंदोबस्त कैस होयगा. हु इज दॅाट मॉजिस्ट्रेट? व्हाट इज हिज नेम? ओ, आय थिंक ही मस्ट बी दी मामलेदार.

शिरस्तेदार—यस, युअर मोस्ट ओबीडियंट.

साहेब—व्हाट इज हिज नेम?

शिरस्तेदार—ही इज काल्ड भित्रोपंत.

साहेब—( हांसून ) भिट्रोपंट, डचाम दॅाट. आय एम् गोइंग टु राईट अबाऊट हिम् टु धी कलेक्टर. इज दंअर एनी मोर बिसिनेस?

शिरस्तेदार—या गांवचे लोकांना समजूत देण्याकरितां बलावले होते, त्या प्रमाणें आले आहेत.

साहेब—वेल, इट्स युवर डयुटी. उस्कूं टुम समजूत डेव.

शिरस्तेदार— त्या लोकांनीं अर्ज आणला आहे.

साहेब —सिपाय, आरजदार हाय!

शिपाई—कोई आरजदार है ( तीन वेळ )

सा:ब —(अर्जदार लाकांची गर्दी पाहून ) ये क्या है· वेल शिरस्तदार.

शिरस्तेदार—सर—

साहेब—ये कया दंगा है· सिपाय उसकूं अंदर मत आना देव. ( शिपाई त्यांस प्रतिबंव करतो ) वेल शिरस्तदार, य गांटु देम, और दो आदमी आनेकू बोलो. (शिरस्तदार बाहेर गे ल्या सारखे करतो )

अर्जदार—कायहो, शिरस्तेदार साहेब, अर्जदारांना आंत जाण्याची का देखिल बंदी आहे!

शिरस्तेदार—बंदी कसची. पण सायबाना असें वाटलें कि तुह्मी गर्दी कराल.

अर्जदार—हां तर, गर्दी कराया साठींच तर आह्मी इथे आलो!! गर्दी करायची असती तर सकाळ पासून तंबुच्या बाहेर उन्हांत तिष्ठत कशाला बसलों असतो!

शिरस्तेदार—बरें, ते असो. त्यांत कांहीं अर्थ नाहीं सायबांचें ह्मणणें असें आहे किं, तुमच्या

पैकीं कोणीतरी दोन इसम या आणि काय तुह्माला हकीकत सांगावयाची असेल ती सांगा.

अर्जदार—ठिक आहे. सतेपुढें शहाणपण नाहीं ह्मणुन ह्मणतात किं नाही तशांतलेंच हें. ( दोघे साहेबाजवळ जातात. )

शिरस्तेदार—( अर्ज हातांत घेऊन) मेहेरबान कनसरवेटर आफ फारेस्ट साहेब बाहादुर यांचे खिजमतीस. खालीं सह्या करणार यांचा नम्रतापूर्वक अर्ज ऐसाजे—

साहेब—डोंट बादर मी. (अर्जदाराकडे पाहून ) मतलब बोलो.

एक अर्जदार—सरकारनें या गांवच्या अजुबाजूचे व जंगलाच्या आसपासचे बहुतेक नंबर राखलेले जंगलांत घेतल्यामुळें गुरें चारण्यास अडचण पडून राबाकरितां टाहाळ व जाळण्याकरितां सर्पण मिळण्याची फारच पंचाईत पडली आहे. रयतेचा जंगलांतील जळाऊ लांकडांवर आणि राबाकरितां टाहाळ, गवत व कुंपणाकरितां कांटी वगैरे आणण्याचा पूर्वापार हक्क व वहिवाट असून त्यास अशा प्रकारें बंदी करणें हा अन्याय आहे.

साहेब—हाम क्या करेगा, कायदेके माफक काम चलता है.

अर्जदार – खावंदांपाशीं आह्मांला इतकीच विनंति करायची आहे, किं या बाबतींत कायद्याची दुरुस्ती व्हावी ह्मणून नामदार हिंदुस्थान सरकाराकडे आह्मी अर्ज करणार आहों. परंतु त्याचा निकाल होई पर्यन्त टाहाळ गवत वगैरे आणण्याची जी आमची नेहमीची वहिवाट आहे त्याला हरकत होऊं नये आणि —

साहेब—वेल, दाट वुईल डू. शिरस्तेदार, आरजपर शेरा लिखो. ( शिरस्तेदार शेरा लिहिण्यास घेता. ) अरजदार ह्मनतात, त्या प्रमानें, हुकम डेन्यास कायडेम, ओ आयमीन कायड्यामदीं शवड नहीं है.

अर्जदार—सरकारांत आमची दाद लागे पर्यंत खावंदानीं—

साहेब—ओ नो, आय क्यान्ट हेल्पिट

शिरस्तेदार—( शेऱ्याखालीं साहेबाची सही घेऊन अर्जदारांस अर्ज परत देतो. )

( अर्जदार जातात. चार वाजतात. )

साहेब—शिरस्तेदार—

शिरस्तेदार—सर—

साहेब—इज देअर एनिथिंग इम्पार्टंट?

शिरस्तेदार—नो सर.

साहेब—वेल सीपाय, गोरेवालेकूं बलाव.

( घोडेवाला येतो. )

साहेब—गोरेवाला, जीनपर गोरा.

घोडेवाला—अच्छा साब.

साहेब—वेल शिरस्तेदार, नौ आय गोईंग टु टेक आ वाक. ( जाता.)

शिरस्तेदार—कां चिमणाजपंत कसें काय? शेवटीं तुमचा तो एक जरूरीचा कागद राह्यलाच. रामभाऊ हे तीन कागद घ्याबरें. अगोदर बारकरून पाठवा. त्या भित्रोपंत मामलेदारांना बहुधा सोनताव पोचतो असें वाटतें.

रामभाऊ—ह्मणजे कलेक्टर साहेबांना लिहिणार वाटतें आपले साहेब.

शिरस्तेदार—(हंसत) लिहिल्या वांचून कसचा राहातो. मोठा द्वाड तो. मनांत आणलेलें करलि तऱ्हां सोडील. आणि लिहिणारा मोठा बाक आहे.

चिमणाजीपंत—समजलों, पण फर्डेशाइ करून तो बिचारा मामलेदार त्या गरीबांना कुठे सोडतो तें त्यांना आटकेंत घालायाला सांगणार.

शिरस्तेदार—मग सांगा जा तर सायबांना. बरें रामभाऊ, आज आपल्यालाही या गांवचे स्नेही मंडळीकडे जायचें आहे.

रामभाऊ—मग चला जाऊं आतां.

शिरस्तेदार—शिपाई ही सगळी आटपा आटप. चिमणाजीपंत, चला, तुह्मीपण आमचे बराबर चला.

( जातात. )

---

# प्रवेश ३ रा

( तलाठी दप्तर सोडून लिहित बसला आहे, इतक्यांत एक सिपाई लखोटा आणून देतो तो घेऊन आंतील कागद वाचल्यासारखें करतो )

तलाठी—(आपल्याशीं) या शिंच्या तलाठगिरीच्या कामाला नांव ह्मणून नाहींच. जी बिगार येईल ती उठवली पाहिजे. मामलेदाराकडे एकादा का

मागिरीचा बोजा आला कीं पकड तलाठी. सध्या या जंगलाचे कामाचें खोगीर आपलें नहमी तयारच आहे. आमचे मित्रोपंत रावसाहेब आज पर्यंत सत्याला भित असत. जंगलचे लोक भलते सलते खटल त्यांच्या पुढें नेण्याला भित असत. पण अलिकडे तें सगळें पारडें फिरलें. त्या कृष्णंभटाच्या समीक्षाच्या खटल्यापासून कांहीं वेगळा रंग दिसतो. असो, मोठ्यांची पंचाईत आपल्याला कशाला हावी. आतांही घराखालची जागा रिकामी करण्याचे संबधानें कशी तजवीज करावी. ( विचार करित बसतो. )

( दोन गृहस्थ येतात. )

पहिला—कां पंत, विचार कसला चालला आहे? कुणाच्या घरावर डोळा आहे

दुसरा —अहो, सध्या विचारता काय? जंगल पेटलें आहेना घालायचें असेल कुणाचें घरदार राखले.या जंगलांत.

तलाठी —कोणाचें कशाला ह्मणता, तुमच्याच घराबद्दलचा विचार चालला आहे. तुह्माला ते दिवशीं सांगितलेंना, किं तुमचीं घरें आणि घरा

चे सभोंवरचीं कंपौंडें ज्या जागेंत आहेत ती जाग
७६१ या सर्व्हेनंबरांतली समजावी ह्मणून सं
ऱ्या कामदारांनीं अभिप्राय दिले आहेत.

पहिला— अहो, पण त्याचा तुह्मी मागें ए
दा निकाल केलात ना?

तलाठी—निकाल कसचा केला दगडाचा. आ
ह्मी आपले समजुती प्रमाणें रपोट केला झालें. प
तो जंगलाच्या अधिकाऱ्यांना कुठे पसंत पडतं
आहे? हा वरिष्ठांकडुन पहा कसा सक्तीचा हुकूम
आला आहे तो. ( आलेला हुकूम त्यांच्यापुढे य
कतो. पहिल्यानें हुकूम वाचल्यावर तो दुसऱ्याचे
हातांत देतो. दुसऱ्यानें वाचल्या नंतर दोघे सु
स्कारा टाकून निराश होतात. )

पहिला—एकूण इंग्रजी राज्यांत न्याय ह्मणून
कांहीं राह्यलाच नाहीं ह्मणायचा.

दुसरा—कसचा हो न्याय. शुद्ध लुटारूपणा
आहे झालें.

पहिला—बरें मग, आतां आपण कांय तजवी
ज करणार?

तलाठी—आपल्याला तर बुवा कांहीं सुचत

नाहीं तुह्मीच सांगा बरें, आतां या हुकमावरून आह्मी काय करावें!!

दुसरा—अहो, करायचें काय!! हातांत चूड पेटवून घेऊन या आणि दिवसा ढवळ्या आमचीं घरें पेटवून टाका ह्मणजे पुनः कांहीं भानगड नको.

तलाठी—असे रागावूं नकाहो. हें पहा या कामांत आमचा कांहीं इलाज आहे का? सरकारचे ठरावा पुढें तुमचें आमचें काय चालणार?

दुसरा—हें पहा. तुह्मी सांगता खरें पंत, पण मनुष्याला राग कसा नाहीं बरें येणार? अहो, आमचीं घरें कांहीं आजचीं कालचीं नाहींतना? शेंपन्नास वर्षांच्या मागचीं आहेत. आणि घराच्या भोंवतालचीं झाडें तर आमच्या आजोबांनीं लावलेलीं आहेत. तेव्हां पेशवाई पासून आमच्या जाग्याचा निर्वेध भोगवटा आमच्याकडे आहे, आन आज तुह्मी ह्मणतां किं ती जागा सर्व कामदारांनीं सरकारी नंबरांत घातली आहे. उद्यां तुमचे सर्व कामदार आमचीं शेतें वाडच्या देखील घालतील सरकारी जाग्यांत, आणि, परवां तर आमच्या

बायका पोरांचा देखील हक उडणार नाहीं ह्मणून कशावरून?

तलाठी—भलतेंच्या भलतेंच.

दुसरा—भलतेंच कांबरें ह्मणता? तुमच्या घरा खालची जागा ह्मणाले सर्व कामगारांनीं सरकारी नंबरांत घातली आहे. ते सर्वेंचे कामदार शहाणे न त्या कामदारांवर भरंवसा ठेऊन असले भलभलते ठराव करणारे अधिकारी सवाई शहाणे. आतां असें आह्मी ह्मटलें ह्मणजे तुह्माला राग येईल. पण जेंव्हां आह्मी घरें बांधलीं तेंव्हां या टोपड्यांचे राज्याचा जन्म देखील झाला नवता. मग हीं सर्वे झाल्याला तर नुकतीं कुठे पंचवीस वर्षे देखील झालीं नाहींत, तेंव्हां आज शंभर वर्षे मालकी प्रमाणें उपभोग घेणारे आह्मी आमच्या जाग्याचे मालक कां सर्वे कामदारांनीं ठरवल्यामुळें सरकार मालक? अहो, यालाका न्याय कां ह्मणायचा. सरासरी राजा करिल ती पूर्व दिशा.

तलाठी—तुह्मीं ह्मणता तें सगळें खरें, तें मी देखील समजतों. पण उपयोग काय? तुमच्या घ

राखालची जमीन गावठणाकडे असून फार वर्षें त्याजवर तुमचा भोगवटा आहे ह्मणून आह्मीं रपोट केलेला तुह्मांला ठाऊक आहेच.

पहिला—पंत, हें पहा, तुमच्या बद्दल आमचें कांहीं ह्मणणें नाहीं, तुह्मांला सगळी या गांवची माहिती आहे हो. पण तुमच्या वरिष्ठांनींच डोळे मिटून न्याय करण्याचा संकल्प केला आहे तिथे काय करता? असो एकंदरींत तुह्माला सांगून ठेवतों, सरकारची दिवसेंदिवस दानत बिघडत चालली.

तलाठी—तुमच्या आजुबाजूला किती बरें घरें आहेत? वरच्या नंबरांत एक तुमचें, रामकृष्णपंत शेवडे, हा यांचें एक, किती तीन झालीं नाहीं? तिन तिन तिन न वामनभट भडगे चार, चार न ती जिजाबाई पांच, पांच पांच न तुमचा तो हा—काय त्याचें नांव हो?

पहिला—अमृता—

तलाठी—अमृत्या नाहीं हो. तुमच्या घराचे पश्चिमचा रामभाऊ लाड नव्हे का? हो, रामभाऊ लाडच. किती झालीं, पांच न एक साहा, साहा

राहा न असत्या सात, न तीं पलीकडलीं तीन न एक चार चार न सात अकरा घरें आहेत नाहीं का त्या नंबरांत?

दुसरा—पण हें पहा, तीं घरें कांहीं सरकारी नंबरांत नाहींत. सरकारी नंबर जुलमानें आमच्या घरावाली शिरू पहात आहे.

तलाठी—कसेंही ह्मणा, पण सरकारचा हुकूम तर मानला पाहिजेना?

दुसरा—माना तुह्माला पाहिजे असेल तर.

तलाठी ह्मणजे?

पाहिला—अहो ह्मणजे काय? सरकारनें आमचीं घरें मोडून आह्माला हांकून लावल्या वांचून किंवा उचलून नेऊन कैदेंत टाकल्यावांचून आमचीं वंशपरंपरेचीं घरेंदारें आह्मी ह्मणुन कांहीं मोडून टाकणार नाहीं. तुह्मीच विचार करा पंत आह्मी कांहीं सरकारचे जंगलांत जाऊन धिंगामस्ती करीत नाहींना? पण आमच्या झोंपडींतच राहूं नका ह्मणून सरकार ह्मणूं लागलें तर आह्मी कसें ऐकावें? तुह्मीच सांगा ह्मणजे झालें.

तलाठी—आपल्याला तर बुवा कांहींच समज

त नाहीं. बरें तें असो, संध्याकाळीं आह्मी तुम च्या घराकडे येऊं, आणि आजुबाजूच्या लोकांचें काय ह्मणणें आहे तें ऐकून घेऊन पाहूं एकदा रपोट करून. बाकी कलेकटर साहेबांनी, मामलेदार साहेबांनी, आणि फारेष्ट आफिसरानी समक्ष ती जागा पाहिलेली आहे.

दुसरा—आहो, समजुन उमजूनच अन्याय करण्याचा मनांत आणला ह्मणजे मग इलाज काय? बरें आह्मी जातों आतां. ( जातात )

तलाठी— ( आपल्याशीं ) खरोखर ह्या च्या कामांत मोठा अन्याय आहे. पण आपण काय करणार त्याला ? सरकाराला खरी हकीकत कळवण्याचें आपलें काम आहे तेवढें आपण करावें. याउपर सरकार हुकूम करील तो शिरसा मान्य केलाच पाहिजे. आज आमचे पाटीलबावा कां आले नाहींत नकळे. जावें, त्यांचा ही तपास करावा. ( जातो )

# प्रवेश ४

बळवंतराव इनामदाराचें घर— बळवंतराव व त्याचे नौकर लोक आणि मित्रमंडळी विचार करीत बसली आहे.

बळवंतराव—बोलाबुवा आतां असें करावें? आजपर्यंत पुष्कळ नुकसान झालें, कित्येक गांव गेले, व्यापार थकला, मिठागर तर सरकारनें बुडवलेंच, झालें शिवाय आमच्या जंगलावर या पुढें आमचा कोणताही हक्क नाहीं ह्मणून सरकारनें ठराव केलाच आहे. मिळून आतां आह्मी नावाचे इनामदार होणार. बरें असो, त्याचेंही कांहीं मी फारसें दुःख केलें नाहीं. कां कीं संपत्तीची कांहीं कधीं शाश्वती नसते. पण आतांतर मला बाबांच्या ह्मणण्याचें चांगलें स्मरण होतें (एका कारकुनास) कां गोपीनाथपंत, तुह्माला देखील स्मरण असेल. सरकारांत आमचे गांव केले कि नाहीं, तेव्हां एकदा असेंच कांहींशा गोष्टीवरून बोलणें चाललें होतें, तेव्हां नाना ह्मणाले हल्लीं

होतें आहे हें कांहींच नाहीं, पण पुढें आमच्या पोराबाळांचे दिवस असुने तरी जातील किंवा नाहीं याची मला मोठी काळजी आहे. त्यांचें भविष्य बुवा अगदीं खरें झालें. काय चमत्कार आहे!! आह्मी सरकारचे घरांत चोरी करायाला गेलों काय!! आजपर्यंत आह्मी सरकारशीं इमानें इतबारें वागत आलों, सरकारनें आमचीं जंगलें आणि गांव घेतलीं तथापि त्याविषयीं कांहीं एक मनांत न आणतां सरकारचा हुकूम शिरसा मान्य करीत आलों,सरकारांत रयतेनें आपले हक्काचे वगैरे संबंधानें अर्ज पाठवावयाचे तयार केले ह्मणजे अधिकाऱ्यांचे भीतानें आणि त्यांना वाईट वाटूं नये ह्मणून ग्रामबंधूंशीं आणि देशबंधूशीं द्वेष संपादून त्यांच्या तिरस्कारास पात्र झालों, आणि फार तर काय, पण थोडेसें राहिलेलें जंगल परवांच नुकतें सरकारनें आपले कडे घेतलें अशा बद्दल ठराव झाला असतांही त्या कामीं आह्मी लीनतेनें सरकारांत अर्जाची वगैरे तजवीज चालू केली आहे. अशा विवंचनेंत आणि संकटांत असतां नाहीं तें कुठलें चोरीचें बालंट आमचेवर यावें काय? असो, दैवाची गती

विचित्र आहे. त्याच्याच मनांतून जर आमच्या देशांतले यच्चावत लोक कंगाल आणि गुलाम करा यचे असतील तर तिथें कुणाचा इलाज चालणार? मला पक्कें ठाऊक आहे कीं, माझ्या जवळ जीं पांच चार हजारांचीं उत्तम पैकीं लांकडें तुटून पडलीं आहेत त्यांच्यावर गुलामांचा डोळा आहे. पण त्या करितां हें कोण विलक्षण धाडस! या पे क्षां तीं सरकारनें आह्माला हवीं ह्मणून घेतलीं तर नको कोण ह्मणतो आहे. आजपर्यंत आमचा गांवच्या गांव आणि जंगलें घेतलीं सरकारनें, तेव्हां काय आह्मी केलें? पण ह्यींचा विभु लुवा या मंडळीनें कांहीं विलक्षण रचला आहे. आपल्याला तर मुळींच कांहीं सुचत नाहीं. आतां तुह्मी सर्व मंडळी मिळून याला कांहीं युक्ति काढाल ती खरी.

एकस्नेही—हें पहा, बाळासाहेब आपण त्याची कांहीं काळजी करूं नये. आपले ते कृष्णाजी पंत वकील आहेत किं नाही, ते कायद्यामध्यें फार वाकब आहेत. तेव्हां त्यांनाच देऊं वकील पत्र आपल्या तर्फेनें, कां कीं, ते रामभाऊ ह्मणतात

या कामी सरकार तर्फे वकील अहेत. तेव्हां त्यां च्या सामान्याला त्यांच्या बराबरीचा ह्मटला ह्मणजे कृष्णाजीपंत.

दुसरा स्नेही—तशांतून कृष्णाजीपंताचा आणि आपला स्नेहही आहे.

बळवंतराव—अहो स्नेह सगळा दामाजीपं ताचा. तुमचे आमचे स्नेहाला विचारतो कोण?

कारकुन—यंदा दराचे नांवानें तर हांकाहांकच आहे. झालें व्याजाचा कोणाकडुन एक छदाम दे खील येत नाहीं. त्राणच नाहीं राहिलें लोकांत. सर कारच बहुधा सर्वांना भिकेस लावणार आहे. शिवा य दिवसेंदिवस लफंगिरी फार वाढत चालली. सचो टीचें नांवाच नको घ्यायाला. पूर्वी असें का असे? तात्यासाहेबांचे वेळेस आह्मी पहात असों किं नाहीं, लाख पन्नास हजार रुपये नेहमी शिलकेंत असावयाचे आतां सगळेंच मन्मंतर बदललें. सध्या सरकारानें जबडा पसरून ठेवला आहे त्याची भर ती होईल तेव्हां लोकांचे पटींत शिल्लक राहिल किं नाहीं? यंदा हा लांकडांची तोड झाली. तेव्हां ह्मट लें येतील पांचचार हजार रुपये. पण तें कांहीं

विपरीतच झालें आतां पुढें काय परमेश्वर करील तें खरें. मग कृष्णाजीपंताकडे जाण्याचा बेत केव्हां करावयाचा?

एकस्नेही.—कसें असलें तरी पुढें येईल तें निस्त रलें पाहिजे. मी आतां तिकडे जातों. तपास करतों केव्हांसी त्यांची स्वस्थपणें भेट होईल ती. आ णि मग आपल्याला घेऊन जाईन, असेंच किं नाहीं?

बळवंतराव—तुह्मी जसें ठरवाल तसें.गोपीनाथ पंत हे सांगतील त्याप्रमाणें तयारी ठेवा.

दुसरा स्नेही—हें पहा, तुह्मी जाऊन या पा हिजे तर. पण कृष्णाजीपंताना इकडला निरोप गेला ह्मणजे तेच येतील इकडे. मनुष्याला चांग ला आहे तो. आतां त्यांचा वकिलीचा धंदाच असल्यामुळें त्यांना पैसे मागणें हें साहजिक आहे पण अडवून घेणारा नाहीं. तो इकडे आल्यावांचून रहाणार नाहीं. मी ही तुमच्या बरोबर येतों.

( जातात. )

म ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

# प्रवेश ९

( कृष्णंभट नांवाचा एक मनुष्य रस्त्यांत आपल्याशीं पुटपुटत आहे )

कृष्णंभट—( आपल्याशीं )"राजा कालस्य कारणं" ह्मणतात् तें कांहीं खोटें नव्हे. स्वतः राजा किंवा त्याचे अधिकारी जोंपर्यंत नीतीनें वागून प्रजेला सुख देत असतात तों पर्यंत त्याला सत्काल किंवा कालाची अनुकूलता ह्मणतात- आणि राजे प्रजाभक्षक झाले ह्मणजे त्या काळास विपरीत काल ह्मणतात. आह्मा भटाभिक्षुकांच्या धर्मकृत्यांत राज्यकर्त्यांचे कायदे आड येऊं लागले तेव्हां सध्या कालच विपरीत आला आहे असें ह्मटल्यावांचून गत्यंतर नाहीं. तो मामलेदारआणि ते बाकीचे शिपुर्डे मला ह्मणतात तो पिंपळ राखलेले जंगलांत गेला!! पिंपळ तर होता त्या ठिकाणींच आहे. बरे जंगलही त्या ठिकाणीं कोठून आलेलें दिसत नाहीं. हे आपले पिशाचवत् अधिकारी नाहीं नाहींते ठराव करूं लागले तर होणार कसें? त्या पिंपळाला मूळीं समिधांचा पिंपळ

ह्मणून नांवच पडून गेलें आहे. तव्हां कैकपिढ्यां पासून आह्मी त्या पिंपळाच्या समिधा आणणार चोर अं !!काय चमत्कार आहे !! ( दुसरा गृहस्थ येतो. )

दु० गृहस्थ—कां काका, तुमच्यावर परवां संक्रांत गुदरली ह्मणतात. दक्षणाकिती ५ रुपये ना?

कृष्णंभट—बाबा दक्षणा कां ह्मणतोस. स्पष्ट दंड ह्मणून ह्मणना. आह्मी या गुलामांच्या घरीं दरोडेच घातले जाऊन मग नको का दंड आह्माला

दु० गृहस्थ—काका, अहो बिचाऱ्या गरिब व कंगाल लोकांना कैदेंत जावें लागतें या जंगल च्या साधारण गुन्ह्याबद्दल. तुह्मी दंडावर सुटलेत हें भाग्यच.

कृष्णंभट—अरे मच्याही ह्मातारपणीं कैदेंत घातलें असतें तर नको कोण ह्मणत होता?

दु० गृहस्थ—आज दुसरी एक गम्मत ऐकलीत का काका?

कृष्णंभट—ती काय बुवा.

दु० गृहस्थ—आहो आपल्या त्या साळू काकू आहेतना ठाउक तुह्माला?

कृष्णंभट—साळू कोण? हं हं समजलों ती दिक्षितांची साळूबाईना? बरें मग?

दु० गृहस्थ—मग काय, तह्मी जसे समिधा आणायला गेले होतेत नाहीं तशी ती लाखोली करितां दुर्वा आणायला गेली होती.

कृष्णंभट—मग तिच्यावर कांहीं खटला बिटला झाला किं काय?

दु० गृहस्थ—अहो ती रांडमुंड पडली. तव्हां तिच्यावर खटलें होण्याचा प्रसंग कशाचा येतो ह्मणा, पण तिला त्या कांतोडचाच्या माळावर न येण्याबद्दल तंबी मिळाली.

कृष्णंभट—ह्मणता काय, खरच कि काय हें? आश्चर्य आहे! हो तुह्माला माहीत असेल. ( हळूच ) काय हो, बळवंतराव इनामदारावर कांहीं आली आहे तोहमत ह्मणतात, खरेंच काय!

दु० गृहस्थ—खरेंच का ह्मणजे, भीत भीत कां बोलतां. मामलेदाराकडे चोरीची फिर्यादच पडली आहे त्यांच्यावर आणि आज तो खटला हुकूम सांगण्यावर आहे ह्मणतात.

कृष्णंभट— विष्णवेनमः कायहो सत्वस्थ

गृहस्थ तो. त्यावर हें असें अं.! त्यांच्या वतनाब द्दल पण सनदा आहेतना ह्मणतात?

दु० गृहस्थ—यांत त्या सनदांचा कांहीं संबंध नाहीं आणि सनदांना विचार तो कोण. अहो ज्यांना सनदा मिळाल्या आहेत त्या वंशपरंपरेच्या आहेत. पण "वंश परंपरेची "अर्थ समजलेत का काय आहे तो?

कृष्णंभट—आह्मा भटांना काय समजे. पण कसा ठरला आहे ऐकूं तर द्या.

दु ० गृहस्थ—अहो, वंश ह्मणजे ज्याला सनद मिळाली तो, परं म्हणजे त्याचा मुलगा आणि परा म्हणजे नातु. झालें आटपलें. चवथे पिढीला तें वतन सरकारचें.

कृष्णंभट—वाहवा! वाहवा. एकून असे वासिष्ट वामदेवासारखे अर्थज्ञ असले ह्मणजे इनामदारांच्या आणि जाहागीरदारांच्या हतांत भिक्षांदेही यायची

दुसरा गृहस्थ—असो, इनामदाराचे खटल्याची मौज पहायाला चला जांऊं. ( जातात )

## प्रवेश ६ वा

( मामलेदार कचेरी—शिरस्तेदार कारकून वगैरे लिहित बसले आहेत. मामलेदार आपल्याशीं च विचार करीत आहे. )

मामलेदार—सध्याच्या स्थितींत नोकरी करण्याचें काम फार कठीण झालें आहे. त्यांतून हा जंगलचा संबंध असला ह्मणजे तर दोहोंकडून ही पंचाईत पडते. अधिकाऱ्यांचे मता प्रमाणें चालवें तर लोकांत नाखुषी उत्पन्न होते. कदाचित् लोकांचे नाखुषीची परवा केली नाहीं, तथापि सत्याचे आणि न्यायाचे कामीं निवळ डोळे मिटावे लागता तें. बरें न्यायदेवतेची आणि लोकांची मर्जी राखून काम करायचें ह्मटलें तर नोकरीवर पाणी सोडण्याचा प्रसंग येतो. वडाचीं पानें आणि पिंपळाच्या समिधा नेणाराला शिक्षा द्यायची ह्मणजे कांहीं न्याय का आहे? पण कायद्यापुढें आपला तरी काय इलाज चालणार आहे? बाकी न्यायदृष्टीनें आह्मी विचार केला ह्मणजे त्यांत कांहीं सवड नाहीं असें नाहीं, परंतु हुजूरचे मर्जीबाहेर ही वागतांना येत नाही. मध्यें त्या दोन तीन अर्जदारांना सोडून दिलें आणि वास्तविक पाहतां तसें करणें गैर

कायदा किंवा अन्यायचें होतें असें नाहीं, परंतु त्यामुळें जंगलच्या अधिकाऱ्यांनीं लगेच गवगवा करून आमच्या मागें शुष्ककाष्ट लावलें. त्याची निस्तरणी आह्मी अजून करतों आहों तों हीं एकामागें एक लच्यांडें आहेतच. हा इनामदाराचा खटला आमचे पुढेंच आला. शिवाय कृष्णं भटाच्या समिधांच्या खटल्याचाही कसा तरी निकाल आह्मालाच करावा लागला. तात्पर्य काय कीं, या जंगलाचे संबंधानें आह्मी आपले अगदीं अपेशी होऊन बसलों आहों. असो जें ओढील आलें तें केलं पाहिजे ( शिरस्तेदारास ) कायहो वकिल नाहीं आले अजून ( केंदी वकील येतात त्यांजकडे पाहून ) कळवा तुमची काय तक्रार असेल ती. गुन्हा न केल्याबद्दलचा पुरावा तर तुह्मी देतच नाहीं ह्मणता कृष्णाजीपंत, होयना? तेव्हां तक्रार काय असेल ती होऊं द्या.

सरकारी वकील—कोर्टापुढें झालेल्या एकंदर साक्षीपुराव्यावरून बळवंत रावावर ज्या गुन्ह्याचा चार्ज ठेवला आहे तो गुन्हा बळवंत रावानें बुद्धीपूर्वक सरकारचें नुकसान आणि आपला फाय

दा करून घेण्याकरितांच केला आहे अशी कोर्टा
ची खात्री झालीच असेल. व ही गोष्ट अनेक
रीतीनें सिद्ध करतां येईल. परंतु पुराव्याच्या ए
कंदर स्वरूपाचें विवेचन करण्याच्या पूर्वीं जंग
लचे संबंधानें सध्या लोकांमध्यें जी चळवळ
सुरू आहे तिच्या विषयीं चार शब्द बोलणें
अवश्य आहे असें वाटतें. लोकांना जंगलांतील
झाडें झुडपें वगैरे तोडण्याची फार दिवस मोक
ळीक असल्यामळें जंगल इतकें तुटलें गेलें किं
त्या विषयीं कांहीं योग्य उपाय योजून जंगला
च संरक्षण न केल्यास सर्व जंगलें उजाड होऊ
न त्यापासून पर्ज्यन्य कमी होईल व त्यामुळें दु
ष्काळा सारख्या भयंकर राक्षसाच्या तोंडांत लो
कांच्या आहुती देणें भाग पडेल असें सरकारचे
नजरेस येऊन सरकारनें रानरक्षणाची पद्धत सु
रू केली. परंत ही मोठी दुःखाची आणि दुर्दै
वाची गोष्ट आहे कीं सरकारच्या पद्धतीनें रयते
ला मार्गा राज्यापासून जंगलचा कायदा होई
पर्यंत जंगलाचा यथेच्छ उपभोग घेण्याची जी मुभा
तिस या कायद्यानें बरीच हरकत आणिली आहे.

तथापि रानें मूळ सरकाचीं असून सरकारचे परवा नगीनेंच त्यांचा आह्मी उपभोग घेत होतों. पण आतां सरकारेंनच जर कायदा करून रान बंद केलें आहे तर तिथे लोकांनीं कुरकुरण्यांत अर्थ काय? परंतु जंगलांतील वस्तूंचा लोकांस आतां हवा तसा उपभोग घेण्यास सांपडत नसल्यामुळें व कांहीं दिवसांनीं सरकार जंगलाची मालकी स र्व प्रकारें आपलेकडे घेणार व त्यामुळें दिवसें दिव स आपण गवताच्या एका काडीला देखील महाग होणार अशी बहुतेक लोकांची समजूत झाली असल्यामुळें जो तो मनुष्य कोणत्या तरी रितीनें जंगलावर हात मारावा ह्मणून संधी पाहात असतो.

आतां सव लोकांच्या हिताची गोष्ट सरकार करीत असतां लोकांकडून त्यास अडथळा कां होतो तो हें सांगत बसल्यास विषयांतर होऊन कोर्टाचा अ मोल्य वेळ फुकट जाईल. याकारितां कोर्टापुढें अस लेल्या खटल्याचे संबंधानें या बाबतींत कोर्टाला इतकेंच कळवायचें आहे, कीं अशा प्रकारची लो कस्थिती असतां जंगलसंबंधें होणाऱ्या गुन्ह्याचें

कामीं भरपूर पुरावा मिळविणें किती दुरघट आहे याचें आनुमान कोर्टानेंच करावें. फार लांब जायाला नको. हल्लीं कोर्टापुढें असलेल्या खटल्याची आरंभापासून सर्व हकीकत लक्षांत आणली ह्मणजे वरील अनुमानाची सिद्धता सहज होणार आहे. या खटल्यास गार्डापासून तों मेहेरबान कन्सरवेटर साहेबापर्यंत जंगलाच्या सर्व अधिकाऱ्यांनीं चोरीचा पत्ता लावण्याकरितां पाहिजे तितकी खटपट केली. परंतु कोर्टापुढें झालेल्या साक्षीदारांपैकीं एकानें तरी या कामाचा कांहीं मागमूस लागू द्यावयाचा होता. निशाणी १ चा साक्षीदार ह्मणजे या खटल्यांतला मूळ फिर्यादी रेंजर हा आपले जबानींत असें सांगतो कीं गार्डानें व मीं पाहिजे तेवढा यत्न केला पण आमचे साहेब पोलिस इनस्पेक्टरास घेऊन येत पर्यंत कांहीं पत्ता ह्मणून लागेना. नि० ७,९,१३,१७ आणि १९ या साक्षीदारांस रावसाहेब पोलीस इन्स्पेक्टर यांजकडून चांगली समजूत मिळेपर्यंत त्यांणीं एक अक्षर देखील सांगितलें नाहीं. परंतु पुढें त्यांणीं पोलीसाजवळ इत्थंभूत हकीकत सांगितली. इतकेंच नव्हे, पण

नंतर त्यांणीं बळवंतराव इनामदाराचे गटांत असलेला मुद्देमालही दाखवून दिला.

कोर्टापुढें जंगलच्या संबंधानें आजपर्यंत पुष्कळ खटले आले असतील व मींही बरेंच खटले चालवले आहेत, तथापि मला असें वाटतें कीं, हल्लीं या खटल्यांत जसा संगतवार, मजबुत आणि मुद्देसूद पुरावा मिळाला आहे असा फारच थोड्या खटल्यांत मिळत असेल. निशाणी १३ आणि १७ या साक्षीदारांनीं आरोपिताच्या ज्या गटांत चोरीचीं लांकडें ठेवलीं ह्मणून सांगितलें त्यांतील सरकारी लांकडे रेंजरनें व गार्डानें ओळखून तीं तोड झालेल्या बुंध्याशीं लावून पाहातां बरोबर मिळालीं असें नि० ११ आणि १० चे साक्षीदारांनीं आपल्या पंचनाम्यांत लिहिलें असून काल कोर्टापुढें ही कबूल केलें आहे. आतां आरोपिताचे विद्वान वकिलांनीं क्रास एक्झामिनेशन मध्यें जरी त्या साक्षीदारांचीं बरीच धांदल उडवल्यामळें त्यांच्या जबानीत फेर पडला आहे तथापि मळ मुद्दा सुटला नाहीं हीं गोष्ट लक्षांत ठेवण्याजोगी आहे. निशाण ११चा साक्षीदार हा पंचनाम्यापैकीं एक पंच असून

क्रासमध्यें तो घाबरला ह्मणून त्याणें बुंध्यापेक्षां मुद्दे मालाच्या लांकडाची वेढ दोनतीन आंगळें कमी आहे ह्मणून सांगितलें. परंतु हा फरक मुद्याचा नसून शिवाय बुंध्यापेक्षां लांकडाची वेढ किंचित् कमी आहे असें मानलें तथापि त्यापासून पुराव्याला ज्यास्तच दृढीकरण येण्याजोगें आहे. ह्मणजे जंगलांत तोड होऊन सुमारें दहा महिनें लोटल्यावर मग चोरीचे मालाचा पत्ता लागला, तेव्हां इतके अवकाशांत तुटलेलें लांकूड कदाचित थोडें सुकून त्याची वेढ कमी झाली असेल, ह्मणून तेवढ्यावरून तें त्या बुडाचें नव्हे असें ह्मणतां येणार नाहीं. शिवाय आरोपिताचे जंगलाशीं सरकारी जंगल लागून असल्यामुळें त्याला सरकारी जंगलांतील चोरून तोडलेलीं लांकडें छपविण्यास जितकी अनूकूलता आहे, तशी अनुकूलता फर्यादीला पुरावा मिळविण्याचे कामीं नाहीं. तथापि एकंदर पुराव्यावरून आरोपितानें सरकारी जंगलांतील लांकडें चोरून आणलीं असें कोर्टाचे नजरेस आलेंच असेल. आणि फारेस्ट आक्टाचें कलम ६८ प्रमाणें जो माल आह्मी सरकारचा आहे असें ह्मणतों तो आरोपि

तानें आपला आहे असें शाबीत केलें नाहीं तर तो चोरीचा आहे असें समजून त्याजवर काम चालविण्यास हरकत नाहीं. हल्लींच्या खटल्यांत जो माल-चोरीचा ह्मणून कोर्टापुढें आणला आहे, तो आपला आहे असा आरोपिताचा बिलकुल पुरावा नाहीं, इतकेंच नव्हे तर १३ व १७ निशाणाचे साक्षीवरून आरोपितानें सरकारी जंगलांतून तो माल चोरून आणला असें शाबीद झालें आहे. फिर्यादी तर्फे जेवढा पुरावा होणें बस आहे तितका कोर्टापढें आलेला असून त्याच्या विरुद्ध आरोपिताचा पुरावा मुळींच नाहीं- तेव्हां या सर्व हकीगतीवरून अरोपितानें गुन्हा केला आहे अशी कोर्टाची खात्री झालीच असेल सबब या संबंधानें जास्त कांहीं न सांगतां मी आपली तक्रार पुरी करतों.

अरोपिताचा वकील—सरकार तर्फेच्या विद्वान वकिलांनीं इतका वेळ पर्यंत जें संभाषण केलें, त्या वरून या खटल्यांतील पुराव्यास महत्व देण्या विषयीं त्यांणीं आपलेकडून पुष्कळ प्रयत्न केला असें दिसतें. तथापि तो कितपत सिद्धीस

गेला आहे हें कोर्टाचेही लक्षांत आलें असेलच. सोन्याचा किंवा रुप्याचा मुलामा दिलेलें भांडें घास तां घासतां जसें त्या पात्राचें मूळ स्वरूप दृष्टीस पडून वरच्या तेजस्वीपणाची असत्यता व्यक्त हो ते, तद्वत या खटल्यांतील पुराव्या विषयी सत्य निरूपणाचा व उपयुक्ततेचा आमच्या विद्वान मि त्रांनीं जों जों प्रयत्न जास्त केला, तों तों त्या पुराव्याचें अंतरगत सर्व स्वरूप पूर्णपणें लक्षांत येऊन त्याचा पोकळपणा इतका उघड दिसूं लाग ला आहे, कीं दुर्दैवी अरोपिताची मुटका होण्या विषयी विशेष तक्रार करण्याचें मला कारण न येतां कोर्ट आपण होऊनच आरोपितास सोडून देईल अशी मला आशा आहे. तथापि आमच्या विद्वान मित्रांनीं कित्येक गोष्टींस व्यवहाराच्या व न्यायाच्या विरुद्ध बरेंच महत्व दिलें आहे त्या विषयीं मी चार शब्द बोलतों.

सरकार तर्फे झालेल्या तक्रारींत, जंगल संबंधा नें हल्लीं लोकांत जी चळवळ सुरू आहे त्या विषयीं बराच विचार केला आहे. आतां वास्तविक पाहिलें असतां कोर्टापुढें असलेल्या खटल्यांत या

गोष्टीचा जरी प्रत्यक्ष कांहीं संबंध नाहीं तथापि सरकार तर्फेच्या विद्वान वकिलांनीं या गोष्टीस आपल्या एकंदर तक्रारींत उपोद्घाताचें स्थान दिल्यामुळें त्या विषयीं मलाही दोन शब्द बोलणें भाग आहे. आमचे विद्वान वकिल आपल्या तक्रारींत असें ह्मणतात कीं, रानाची मालकी सरकाराकडे आहे, परंतु अरण्यें, पर्वत, नद्या आणि सरोवरें यांजवर राजाची मालकी नसून तीं सार्वजनिक उपयोगार्थ असल्याबद्दल शास्त्रकारांचे स्पष्ट अभिप्राय आहेत, हें आमच्या विद्वान मित्रासही माहित असेल. आतां अशी जरी गोष्ट आहे, तथापि सरकारनें कायदा करून रानाची मालकी आपणाकडे घेतल्यामुळें लोकांनीं त्या कायद्या प्रमाणें वागणें फार अगत्याचें आहे व त्या प्रमाणें लोक वागतही आहेत. कोर्टापुढें फारेष्ट अक्टाप्रमाणें बरेच गुन्हेगार आले असतील, परंतु त्यांत सरकारच्या कायद्याची किंवा हुकमाची बुद्धिपूर्वक अवज्ञा करणारा एक ही मनुष्य आला नसेल असें मी खात्रीनें ह्मणतों. आतां गेरसमजुतीनें किंवा पोटार्थीपणामुळें अथवा निरुपायामुळें

कदाचित् कित्येक लोकांचें हातून जंगलच्या संबंधानें गुन्हे घडत असले तथापि ती गोष्ट हल्लींच्या खटल्यास मुळींच लागू नाहीं. आणि हे गुन्हे घडण्याचें कारण तरी हा जंगलचा कायदा देशस्थिती आणि लोकरिवाज यांस अनुसरून नसल्यामुळें गरीब व रानटी लोकांच्या साधारण उदरनिर्वाहाच्या धंद्यासही अपराधाचें स्वरूप येऊन ते तुरुंगात जात आहेत. असो, या संबंधानें उगाच कोर्टाचा वेळ न मोडतां फिर्यादी तर्फे कोर्टापुढें मोठ्या दिर्घ परिश्रमानें आणि विशेषें करून पोलिसाच्या मदतीनें जो पुरावा आणला आहे त्यांतील व्यंगता आणि संदिग्धपणा कसा मासलेवाईक आहे या विषयीं चार शब्द बोलण्याची परवानगी मागतों.

या खटल्यांतील दुर्दैवी अरोपितावर जी चोरी केल्याचा आरोप स्थापित करण्या विषयीं फिर्यादी प्रयत्न करित आहे, तशा प्रकारची चोरी होण्याचा कितपत संभव आहे? या प्रश्नाचा निकाल करूं लागलें तर, सरकारानें जंगल रक्षणाचे कामीं जे खंडोगणती कामदार नेमले आहेत,—जसें गार्ड, राऊंड

गार्ड, रेंजर, फारेस्ट आफिसर वगैरे--तर अशा डोळ्यांत तेल घालून पहारा करणाऱ्या कामदारां च्या डोळ्यांत धूळ टाकून आज शंभर किंवा १५० मोठमोठीं लांकडें चोरून नेणारा कोण चोर असेल या विषयीं विचार करूं लागलें ह्मणजे दोन गोष्टी संभवतात. ह्मणजे या जंगलरक्षकांनीं खुशाल घरीं झोपा काढून कामांत हायगय केली असें एक ह्मणावें लागतें, किंवा दुसरें मुद्दलांत चोरी झालीच नाहीं असें ह्मणणें भाग पडतें. या पैकीं पहिली गोष्ट खरी ह्मणावी, तर साधारण लांकडांची भारी, गवताची मोळी, किंवा पानाचा पुडा—किंवा याही पेक्षां—कोर्टापुढें नुकताच एका भिक्षुक ब्राह्मणावर पिंपळाच्या समीधा चोरल्या बद्दल खटला चालून त्यास पांच रुपये दंड झाला आहे ही गोष्ट लक्षांत आणली ह्मणजे जंगलरक्ष क मंडळी आपले कामांत किती दक्ष असते हें सहज लक्षांत येण्याजोगें आहे. बरें दुसरी गोष्ट खरी ह्मणावी—ह्मणजे चोरी झाली किंवा नाहीं याचाच जर संशय घ्यावा, तर त्या विषयीं अनेक अडचणी आहेत.

[library stamp]

आतां फिर्यादीच्या ह्मणण्याप्रमाणें सरकारी जंग लांत चोरी झाली असें क्षणभर मानलें तथापि ह्या ह्मीच्या आरोपितानें ती केली असें ह्मणण्यासारखा कोर्टापुढें झालेल्या साक्षीपुराव्यांत कांहीं भाग आहे कीं काय या विषयीं विचार केला पाहिजे. पुराव्याविषयीं विचार करूं लागलें ह्मणजे त्या परस्परांत तर विलक्षण तऱ्हेचा विसंगतपणा आहे. इतकेंच नव्हे तर प्रत्येक साक्षीदाराच्या स्वतःच्या जबानींतच एका गोष्टीचा मेळ दुसऱ्या गोष्टीशीं नाहीं अशी स्थिति आहे. निशाण एकचा साक्षीदार ह्मणजे या खटल्यांतील फिर्यादी हा आपले जबानींत एकदां असें सांगतो " कीं लांकडांचे बुंधे जळाले होते, आमच्या लोकांनीं इनामदाराचे गटांतील लांकडें जंगलांत आणलीं व नंतर पंचांना बोलावून पंचनामा केला." पुन्हा ह्मणतो की " मी चुकलों. वर हकीकत सांगितली तशी नाहीं. बुंधे जळाले नवते व इनामदाराचे गटांतून लांकडें काढलीं तेव्हां पंच तिथे होते" या साक्षीदारानें आरंभीं सांगितलेला मजकूर लिहून घेण्याविषयीं मी कोर्टास केलेली विनंति आरोपिताच्या दुर्दैवामुळें कोर्टानें

जरी नाकारली, तथापी साक्षीदारानें सांगितलेल्या मजकुराचें कोर्टास चांगलें स्मरण राहण्यासारखा तो मजकूर असल्यामुळें त्याचा फायदा आरोपितास मिळेल अशी मला पूर्ण आशा आहे. निशाण ७, २, १३, १८, १९ हे साक्षीदार "जंगलच्या अधिकाऱ्यांनीं तपास करण्याविषयीं पुष्कळ प्रयत्न केला तथापि त्यांजपाशीं या माहितीचें जननच नसल्यामुळें कबूल झाले नाहींत असें स्वत: फिर्यादी ह्मणतो व पुढें 'रावसाहेब पोलीस इन्स्पेक्टरांनीं त्यांना समजूत दिल्यानंतर त्यांणीं सर्व माहिती फिर्यादीला पाहिजे होती तशी सांगितली.' ही पोलिसाची समजूत ह्मणजे समजून सांगणें असा जरी सरकार तर्फेच्या वकिलांनीं त्याचा अर्थ केला आहे, तथापि पोलिसाची समजूत कशा प्रकारची असते याविषयीं मला कांहीं स्पष्टीकरण करण्याची जरूर दिसत नाहीं. कित्येक पोलीसांनीं समजूत देऊन आणलेल्या साक्षीदारांच्या पुराव्यावरून कित्येक दुर्दैवी आरोपितांना विनाकारण कारागृहांत जाण्याचा प्रसंग आल्याचीं उदाहरणें घडलेलीं आहेत. तथापि आजच्या खटल्यांत कोर्टापुढें आले

ले निशाण ७, ९, १३, १७ १९ चे साक्षीदार जबानी देत असतां त्यांचें मधून मधून राव साहेब पोलीस इनस्पेक्टर यांजकडे पाहाणें, एकदां जबाब दिला असतां घाबरल्यासारखें होऊन आपणच पुनः तो जबाब फिरवून सांगणें, क्रास एक्झामिनेशनमध्यें केलेल्या सवालांवर — मला माहित नाहीं, मला स्मरण नाहीं, आणि माझे लक्षांत नाहीं—अशीं ठगींव उतरें देणें, वगैरे गोष्टींवरून पोलिसाचे समजूतीचा ठसा साक्षीदारांचे मनावर कसा उठला होता हें कोर्टाचे लक्षांत आलें असेलच. व अशा साक्षीदारांच्या भरंवशावर आरोपिताला शिक्षा देणें किती अन्यायाचें आहे याचा ही कोर्ट विचार करलिच. असो, मिळून तात्पर्य काय कीं, मूळ चोरी झाली किंवा नाहीं हीच गोष्ट संदिग्ध आहे. बरें ती झाली असें मानलें तरी इनामदाराच्या गटांतील नेलेलीं लांकडें चोरीच्या माला पैकीं आहेत असा बिलकुल पुरावा नसून, जो कांहीं थोडा बहुत पुरावा मारून मुटकुन कोर्टापुढें आणला आहे तो किती विसंगत आणि बेभरंवशाचा आहे हें कोर्टास आतांच क

ळवलें आहे.

आमचे विद्वान मित्रांची शेवटली तक्रार अशी आहे कीं, फारेष्ट अक्टा प्रमाणें जो माल जंगल चें उत्पन्न ह्मणून जंगलच्या अधिकाऱ्यांनीं जप्त केला असेल तो आपला आहे असें दाखवण्याचें काम आरोपिताचें आहे. आतां फारेष्ट अक्टाचें हें कलम पुराव्याच्या कायद्याशीं अगदीं विरुद्ध आहे. तथापि या कलमा प्रमाणें विचार करूं लागलें असतांही या खटल्यांतील आरोपितास ती गोष्ट लागू होत नाहीं. कां कीं, हल्लीं कोर्टापुढें असलेला आरोपीत हा यःकश्चित् मनुष्य नसून इनामदार आहे व त्याच्या इनाम जंगलांत नुकती च तोड झाल्याचें खुद्द फिर्यादीनें व या खटल्यां तील सर्व साक्षीदारांनीं कबुल केलें आहे. तेव्हां अशी स्थिती असतां आरोपितानें राजरोसपणानें आपल्या मालकीचे जंगलांतील तुटलेल्या लांक डांचे ढीग घालून ठेवलेले जंगलच्या अधिकाऱ्यांनीं निराधार संशया वरून जप्त करणें आणि त्याजवर चोरीचा आरोप आणून त्याच्या अब्रूस धक्का बसवणें ही गोष्ट फार दुःखाची आहे. सरते शेवटीं

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

कोर्टाला माझी इतकीच विनंती आहे कीं, फिर्यादीनें आरोपितावर विनाकारण हा प्रसंग आणल्यामुळें तो बिचारा दुर्दैवानें तुरुंगांतील यमयातना भोगीत आहे या करितां त्याला त्या दुःखांतून आणि आरोपांतून मुक्त करावा.

मामलेदार— ( कांहीं वेळ लिहिल्यावर ) हें पहा, तुह्मी वकिलानीं आपअपल्या तर्फे तक्रारी कळविल्या तें ठिकच आहे. परंतु सरकारी लांकडें चोरीस गेलीं त्याबद्दलचा विचार झाला पाहिजेना? कायद्याप्रमाणें विचार केला ह्मणजे या कामांत इनामदाराची कसूर आहे अशी आमची खात्री आहे. तशांतून हा जंगलचा खटला. या कामीं फार जपावें लागतें बुवा. कृष्णाजीपंत, तुह्मी ह्मणतां अशा कारणानें जर आरोपी सोडूं लागलों तर जंगलचा बंदोबस्त व्हायला फार पंचायत पडेल. आतां रावसाहेबांनीं नाहीं का सांगितलें आपल्या तक्रारीमध्यें, आणि तुह्माला ठाऊक आहे, हल्लींच्या खटल्यांत जर आह्मी सईल नजर ठेविली तर अनेक अडचणी आहेत. तेव्हां या खटल्यांत आरोपीनें २ महिनें सक्त मजुरी करावी

आणि १०० रुपये दंड द्यावा असा आह्मी ठरा व करतों.

( आरोपीत व त्याची आनुयायी मंडळी रडूं लागते. शिपाई कैदीला घेऊन जातात. वकील टेबलावरचीं बुकें नोकराजवळ देऊन कचेरीच्या बाहेर येतात व पडदा पडतो. )

सरकारी वकील— ( आरोपीचे वकिलास ) कां, बयाण्याची रक्कम पदरांत पडली असेलच. इनामाला मात्र गोता आला.

अरोपीचा वकील—तो येइल हें मी पूर्वी भविष्यच केलें होतें. भित्रोपंताचा तो पूर्वीचा निस्पृहीपणा गेला. आतां नावा प्रमाणें कृती होऊं लागली.

स० वकील—करतो काय बिचारा. नौकरीला जपावें लागतें ना?

आ० वकील—समजलों हो, पण न्यायाकडे कांहीं पाहायला नको का? तुह्माला सांगतों, एकंदरींत आजच्या कामांत अन्याय आणि जुलूम झाला. तुह्मीच सांगावरें निःपक्षपातानें.

स० वकील—पुराव्यापुढें काय करता? पुरा

वा कसा तो पाहिलात ना? बाकी दंडावर सुटेल असें मला वाटत होतें, पण जंगलचा संबंध ह्मणून तसें झालें नाहीं.

आ० वकील—कसला हो पुरावा होता? आतां इतकें मात्र खरें—मुख्य पुरावा तुमच्या बाजूला होता,—अहो आह्मी का कधीं पुरावे पाहिले नाहींत का ऐकले नाहींत? पण जंगलचा खटला ह्मटला किं तिथें आरोपिंचा पुरावा आटपला. आज बळवंतरावावर प्रसंग आहे, उद्यां कोणावर येईल याचा काय नेम. एकंदरींत या जंगलच्या कायद्यानें गहजप केला आहे.

स० वकील—तें कांहीं खोटें नाहीं. कायदा वाईटच. आतां आपण कोणत्याही पक्षाचा एकदा क्षण घेतला ह्मणजे त्या प्रमाणें सगळा विधी आटोपावा लागतो, पण एकंदरींत वाईट प्रसंग. (स्मरल्यासारखें) अरे हां, मी अगदींच विसरलों होतों. आज तुमची बडी सभा आहेना जंगलाबद्दल?

आ० वकील—आमची ह्मणजे, तुह्मी नाहीं का त्यांत? अरे, भाव घेतलात तरी तुमच्या आंगांत शिरलेलें वारें अजून सुटत नाहीं!

स० वकील—नाहीं, तसें नाहीं कांहीं. मग यायचेंना सभेला? वेळ होऊन गेला. बहुधा सुरवात झालीच असेल. चला परभारेंच जाऊं.

( जातात )

## प्रवेश ७ वा

( सभेची जागा—एका बाजुला कांहीं बडीबडी मंडळी तक्यांशीं टेंकून बसली आहे, दुसरे आंगास कित्येक जातीचे गरीब लोक घोंगड्या पांघरून व मळकीं पागोटीं डोकिला गुंडाळून बसले आहेत. त्यांच्यापासून आणखी थोडयाशा अंतरावर कातकरी व गवळी वगैरे लोक खांद्यावर घोंगडी टाकून उघडे बोडके बसले आहेत एका बाजूस पुढारी मंडळी कांहीं कागदपत्र हातांत घेऊन विचार करीत आहे व एकमेकांच्या कानाशीं लागत आहेत. बड्या लोकांच्या समोरचे बाजूस एक लहानसें टेबल ठेवलें असून त्याच्या शेजारीं असलेल्या खुर्चीपुढें एक गृहस्थ उभा असून तो

त्या सभेंतील लोकांना काहीं हकीकत सांगणार इतक्या संधींत पूर्वी सांगितललें दोन वकील आल्यावर त्याचें आगत स्वागत होऊन त्या टेब लाजवळील मनुष्यानें बोलण्याची सुरवात केली. )

गृहस्थ—या जंगलच्या संबंधानें चार शब्द सांगितले असतां त्यापासून शेतीच्या धन्द्याला व मुख्यत्वेंकरून शेतकऱ्यांना कशा अडचणी आल्या आहेत व येण्याजोग्या आहेत हें सहज कळून येईल.

जंगल रक्षणाचे संबंधानें हिंदुस्थान सरकारनें सन १८७८ सालीं एक कायदा केला आहे व त्या कायद्याला अनुसरून मुंबई सरकारनें एक रूळ ठरविलेली आहे. आणि या कायद्या प्रमाणें व रूळी प्रमाण सरकारानें सार्वजनिक उपयोगा च्या कित्येक जमिनी राखलेलें जंगल करण्या करितां घेतल्या असून त्या जमिनीवरील लोकां च्या हक्कसंबंधाचा विचार करण्याकरितां सेटल मेंट हफीसरांची नेमणूक केली होती, त्यांणीं जे ठराव केले आहेत त्याचे योगानें लोकांचे हक्क व वहि वाटी यांना प्रतीबंध होऊन जंगलांतल्या साधारण

कातकऱ्यापासून तों मोठ्या इनामदारापर्यंत प्रत्येक मनुष्य गुन्ह्याच्या पेचाटींत येण्याचा संभव आहे. सध्याची देशस्थिती पाहिली असतां पोट भर अन्न आणि शरीर आच्छादन करण्याकरितां जाडें भरडें वस्त्र मिळण्याची पंचाइत पडते अशा लोकांची संख्या पुष्कळ मिळेल. अशा दीन कंगाल व दूरदर्शी लोकांमध्यें कुणबी व कातवडी वगैरे लोक प्रमुख होत. या लोकांना खरोखर पोटभर अन्न ह्मटलें ह्मणजे साऱ्या वर्षांतून चार सहा महिने मिळत असेल किंवा नाहीं याचा संशयच आहे. यांच्या चरितार्थाचा बहुतेक गुजारा जंगलांतील भाजीपाला व कंदमुळें यांजवर चालत असे. परंतु सध्या झालेले जंगलचे बंदो बस्तानें त्या बिचाऱ्या लोकांची उपासमर होत आहे. फार तर काय, परंतु ज्यांना उभ्या वर्षांतही जंग लांत पाऊल टाकण्याचा प्रसंग येत नाहीं अशी कित्येक श्रीमंत व इनामदार वगैरे मंडळी आहे त्यांना या कायद्याचें भयंकर स्वरूप जरी प्रत्यक्ष दृष्टीस पडत नाहीं तथापि त्यांच्या इतमामास आणि ऐश्वर्यास लागणारा पैसा जमिनींतून उत्पन्न

होण्याचा असून त्याला मुख्य साधन शेतकरी आणि गुरें होत. या जंगलचे कायद्याचा अंमल जारीनें चालू झाला ह्मणजे बिच्यारे शेतकरी आणि गुरें यांची इतिश्री होणार आहे आणि तसें झालें ह्मणजे जाहागिऱ्या आणि इनामे कांहीं चाटायचीं तर नाहींतना? अशा प्रसंगीं पृथ्वीमातेची चाकरी करण्याकरितां अमचे इनामदार व वतनदार वगैरे मंगळीला खांद्यावर नागर टाकून बाहेर पडण्याचा प्रसंग येईल. पण परिणामीं तर राखलेल्या जंगलांतून नागरखुंटही मिळण्याची मारामार पडेल. हा जंगलचा कायदा सर्व देशाचें जंगल करून टाकतो कीं काय याची मोठी भीति आहे. तेव्हां असल्या भयंकर व राक्षसी कायद्याला भाजिबात टाळा मिळाला पाहिजे किंवा निदान त्याचें स्वरूप तरी सौम्य झालें पाहिजे. पौराणीक काळामध्यें ब्राह्मणाना पिडा करणारे राक्षस उत्पन्न होत असल्याचें पुराणांत लिहिलें आहे त्याचप्रमाणें हे फारेष्ट आक्टरुपी दैत्यराज सर्व लोकांना केवळ पीडा करण्याकरितां उत्पन्न झाले आहेत आणि पुराणांतले दैत्य ज्याप्रमाणें एखाद्या देवते पासून

वरदान मिळाल्यामुळें प्रमत्त होत असत तद्वत् हा फारेष्ट आक्ट मुख्य अधिपतींचें वरदान घेऊन जंगलप्रसारार्थ लोकांना नाडीत आहे. हा जंगली कायदा नुसता जंगलांतच संच्यार करून राहता तर ती गोष्ट वेगळी, पण सेटलमेंट हाफिसरासार ख्या कामदारांनीं या कायद्याचे फारच लाड केल्या मुळें तो लोकांच्या वतनवाड्यांत शिरून घरादारांचे पाये खणण्यापर्यंत येऊन पोंचला आहे. शेतीचें मुख्य साधन जंगल, शेत भाजण्याकरितां गवताला जंगल, कुंपण घालण्याकरितां टाहाळ वगैरे पाहिजे तें मिळण्याचें ठिकाण जंगल, फांटीं लाकूड आणाव याला जंगल, गोरगरिबांच्या निर्वाहाला फळफळा वळ व भाजिपाला मिळण्याचें ठिकाण जंगल, असे सर्व प्रकारें लोक जंगलावर अवलंबून अस ल्यामुळें त्याचे बंदोबस्तानें या जिल्ह्यांतील लोकांची उपासमर आणि गैरसोय झाली आहे. उत्तम शेती ह्मणून ह्मणतात ती आतां लोकांना नकोशी होण्याचा प्रसंग येत चालला आहे, तरी सर्व लोकांनीं या बाबतींत कांहीं तरी उपाय योजला पाहिजे. हल्लीं हा मंडळीनें अर्ज तयार

केला आहे तो नामदार मुंबई सरकाराचे मार्फत नाम, दार हिंदुस्थान सरकाराकडे पाठवावा असें कित्येक गृहस्थांचें ह्मणणें आहे. या गोष्टीला कोणाची हर कत नसेल तर सह्या घेऊन अर्ज पाठवण्या बद्दल तजवीज व्हावी.

( अर्ज पाठवावयाला कोणाची हरकत दिसत नाहीं असें एका गृहस्थानें ह्मटल्यावर सह्या वगैरे होऊन सभेचें काम आटपलें )

# प्रवेश ८ वा

विदूषक— ( आपल्याशीं ) कोणतेंही काम अगोदर पतकरूं नये आणि पतकरलें तर तें पुरें केल्याशिवाय सोडूं नये हें मला देखील समजतें, पण आमच्या मित्रा बरोबर हेलपटे घालतां घालतां माझा जीव तर कसा बेदम होऊन गेला आहे. आतां या प्रयत्नांत फलश्रुती होते किंवा नाहीं याचा वा नवाच आहे, आणि हा बुवा नाटककर्ता तरी भ ला वस्ताद!! नाटकाचें नांवच ठेवलें आहे अरण्य रोदन. ह्मणजे जंगलाबद्दल सरकारापर्यंत ओरड

नेऊन दाद लागली तर ठिकच आहे, नाहीं तर आपलें हें सगळें कृत्य अरण्यरोदन समजून स्व स्थ बसावें. आजपर्यंत केलेल खटपटींत बहुधा अरण्यरोदनाचाच मासला झाला आहे. पण ही रड तरी अजून आटपली किं नाहीं कुणाला टाऊक. मंडळीनें सभा भरवून अर्ज तयार करण्याकरितां जिवापाड श्रम केले, त्याचें उत्तर सरकारनें अगदीं थोडक्याशा ओळींत देऊन बहुधा नन्नाचाच पाढा वाचला. आतां ह्मणतात प्रस्तुतचे जिल्हाधिकारी यांनीं या आरडा ओरडीची चवकशी करावी ह्मणून कमिशन नेमण्याबद्दल ठराव केला आहे. आमच्या मित्राला सध्यां या जंगला वांचून दुसरें कांहीं सुचत नाहींसें झालें आहे. खातां, पितां, उठतां, बसतां, याला जंगल दिसत आहे. या जंगलापायीं याणें अपल्या धंद्यावर उदक सोडलें, मिळकतीवर लाथ मारिली, कित्येक अधिकाऱ्यांचे मनांत आपणा विषयीं वितुष्टपणा उत्पन्न करून घेतला, व्यवसाय बहुत तेढ पाडून घेतली, घर कामाकडे दुर्लक्ष झाल्यामुळें आप्त सोयऱ्यांकडून शिव्यांचें बक्षिस मिळविलें, तरी आमचा हा सार्व

जनिक जंगली काका आणि हेकेखोर मित्र जंगली असोसिएशनचा बोजा डोचक्यावर घेऊन धूम खेपा घालतोच आहे. आपल्याला तर बुवा याच्या संगतीं घिरट्या घालण्याचा आतां कंटाळा आला. पण कमिशन नेमल्याबद्दल आमच्या मित्रानें जें चुटपुटतें सांगितलें त्याची हकीकत विचारली पाहिजे. त्या कमिशन पुढें जर कां साक्षी बिक्षीचा आह्माला प्रसंग आला तर मग आमची साडेसाती च ओढवली ह्मणायची.

सूत्रधार—( पडद्यांत )

कांणतें ही काम करायचें ह्मणजे त्याला दहा मंडळी झटून पडल्यावांचून तें होत नाहीं. आरंभीं हा प्रयोग करण्याविषयीं आमच्या शैलूष मंडळीनें माझी पाठ पुरवली. आणि आतां जो पहावा तो झोंप घेणार. आजपर्यंत अर्ज वगैरे करून केलेली मेहनत जंगल कमिशन नेमलें जाऊन कुठे नावारुपास आली आहे. पण आतां या कमिशन पुढें चाललेले साक्षी पुराव्याचे वेळेस जर माघार घेतली तर कसें होणार? पाकनिष्पत्ती करून पंचपक्वान्नांनीं भरलेलें ताट पुढें आलें असतांही जर मंडळी

भराभर पळूं लागली तर आपलें दुर्दैवच नव्हे का? आपल्याला तर बुवा आतां यांना या या ह्मणण्याचा कंटाळा आला.

विदूषक — आहो महाराज, पात्रें मांडलीं असलीं तर मग आमच्या सारख्यांना या या ह्मणायला नको. हा मीं सोंवळें नेसून आलोंच समजा.

सूत्रधार — ( पडद्याच्या बाहेर येऊन ) कोण तुह्मीच का हे राजश्री दीर्घ शहाणे. जेवायला नाहीं बलावलें तुला.

विदूषक—आतां ह्मणालेतना पाने वाढून ठेवलीं आहेत ह्मणून?

सूत्रधार—बरें तें असो. आतां थट्टा पुरे. जंगल कमिशन नेमलेलें समजलेंना तुला?

विदूषक—ऐकलें खरें. पण त्यांत काय, गुळाचा गणपती आणि गुळाचाच नैवेद्य.

सूत्रधार—तें कसें?

विदूषक—अहो बहुतेक कमिशनर मंडळी सरकारची ताबेदार असल्यावर रिपोर्टांचे वेळेस घोडे मेंढ खाणार नाहीं का?

सूत्रधार—वेडा आहेस, अरे सरकारी अधिका

री निःपक्षपाती नसतात कीं काय? ह्यांची मंडळी खरोखर चांगली आहे

विदूषक—असेल, पण करणार काय हो हे? चौकशी करून जंगल सोडून देण्याबद्दल ठराव करण्याचा अधिकार दिला आहे का सरकारनें या कमिशनाला?

सूत्रधार—तसा अधिकार नसला तरी यांनीं चांगला रिपोर्ट केला ह्मणजे आपलें कार्य झालें

विदूषक—तसें तुह्माला वाटत असेल, तर चुली वरील तापलेल्या दुधाच्या पातेल्याकडे नजर ठेऊन आशेनें लाळ घोटीत बसलेल्या मांजराप्रमाणें तुह्मी आपलें स्वस्थ बसा. आह्माला या भानगडींत घालूं नका.

सूत्रधार—ह्मणजे काय?

विदूषक—अहो, काय हें कशाला विचारता? आजपर्यंत जीं कमिशन नेमलीं गेलीं त्यांणीं काय केलें तें सांगा. बडोदा कमिशन नेमल्यानें मल्हार रावाचे पाय बडोद्याचे गादीला लागले का? दुष्काळ कमिशन नेमल्यानें अन्नान्न करून मरणारे कंगाल लोकांचे पोटापाण्याची कांहीं सोय झाली का?

एजुकेशन कमिशन नेमल्यानें विद्याशुद्धीचे मार्ग सुलभ झाले आहेत की? या कमिशनांपासून मला तर कांहीं येक फायदा झालेला दिसत नाहीं. हीं कमिशनें ह्मणजे निवळ लोकभुलवणें आहे. इंग्रज सरकारची ही पालिसी ह्मणजे एक खुबी आहे. कोणत्याही कामीं जास्त गवगवा झालासा वाटला, ह्मणजे हें आपलें कमिशनरूपी भावलें उभें करून ठेवायचें. अहो, जिथें सरकारच्या बडे बडे अधिकारी मंडळींनें जंगलावर रयतेचा हक्क आणि भोगवटा कबूल करून आपले हात कलम करून दिले आहेत. तिथें आणखी चौकशी करता कसली डोंबलाची!! हें पहा, जाग्याला जागें करणार कसे तुह्मी? खांडव वन भक्षण करणाऱ्या अग्नीनारायणाप्रमाणें सरकार आपलें जाबाड पसरून सगळीं जंगलें स्वाहा करायला बसलें आहे, तिथें तुह्मी त्याच्या तोंडावर हात देणार तरी कसा?

सूत्रधार — बाबारे, असले आपण वितंडवाद करूं लागलों तर निभाव लागणार नाहीं. हें पहा सरकारला जर दाद द्यायची नसती तर मग हें कमिशन पाहिजे होतें कशाला? चौकशीचे वेळीं

[library stamp]

जंगलचे कामदारांपासून लोकांवर कसकसे जुलूम होतात, ते आतां बाहेर पडूं लागले आहे साक्षीदा रांकडून समजलास का!

विदूषक—समजलों हो. मुळ हें फारेस्ट खातें फुगवण्यांत सरकारचाच जर रयतेवर जुलूम आहे, तर मग त्या जुलमी खात्यांतल्या कामदारांनीं लोकांवर जुलूम करणें यांत विशेष काय! पि.. मनुष्याच्या हातांत चूड देऊन मग तो घरें .ाळ तो ह्मणून चौकशी करीत बसायचें यांत काय हंसल. अहो, कमिशन पुढें असले पुरावे आले तर बिचारे जातील पांचपन्नास गार्ड आणि राऊंड गार्ड ठेपीला. पण त्यांत आमचें काय वळलें? सरकारनें गिळलेलें आपलें जंगलरूपी माणीक जर हें कमिशन सरकारकडून ओकवील तर उपयोग. नाहीं तर ही खटपट करून लोकांकडले वगर्णानें उकळे ले पैशांनीं आगगाडी, खाणावळी, गाडीवाले छापख नें आणि वकील यांची भरती केली येवढी मात्र होईल.

सूत्रधार—हें पहा. आतां काय होईल ? होवो, पण आरंभलेलें कृत्य शेवटास ने.

पाहिजेना?

विदूषक—न्या पाहिजे तर.

सूत्रधार—असें आंगानिराळे टाकुन उपयोग नाहीं. सर्वांनीं या कामाला हातभार लावलें पाहिजे.

विदूषक—बरें, पण ही प्रेक्षक मंडळी आतां कंटाळलीशी दिसते तुमचा अरण्यरोदन नाटकाला.

सूत्रधार—विदूषका आतां या सभाजनांत कमिशन पुढील सर्व साक्षीपुरावा पुरा होईपर्यंत या ठिकाणी तिष्ठत बसण्याचे श्रम न देतां यापुढें हकिकत घडली ता पुनः अभिनीत करून दाखावि ण्याविषयीं अभिवचन देऊन सर्व मंडळीचा आतां तूर्तपण निरोप घेऊं.

( जातात )

**समाप्त**

[library stamp]